# पुणे महानगरपालिका
# सन २०१२–१३

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

पुणे शहराच्या भौगोलिक क्षेत्राचा ''**सर्वांगीण व समतोल विकास**'' केंद्रबिंदू मानून शहराच्या वेगवान नागरिकरणाच्या प्रमाणात आवश्यक पायाभूत सेवा सुविधा निर्माण करण्यासाठी उपलब्ध वित्तीय साधनसंपत्ती व्यतिरिक्त महापालिकेच्या भूमि जिंदगीचा अधिक उत्पादक वापर होऊन शहराची वाढ अधिक सुनियोजित व शाश्वत विकासाभिमुख होण्याचे दृष्टीकोनातून सन २०१२–१३ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार पुणे शहराची लोकसंख्या सुमारे ३१.१५ लाखापर्यंत पोहोचली असून मागील दहा वर्षामध्ये लोकसंख्या वाढीचा वेग सुमारे २२.७३% असला तरी, पुणे नागरी समूह क्षेत्राची लोकसंख्या ही सुमारे ५०.५० लाखापर्यंत पोचली आहे. या संपूर्ण लोकसंख्येचा ताण हा शहराच्या नागरी सुविधांवर पडत असल्याने शाश्वत नागरी सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेला प्राथम्य द्यावे लागणार आहे.

मुलभूत नागरी सेवा सुविधांचा दर्जा हा प्रामुख्याने निर्धारीत केलेल्या विहीत सेवा दर्जा मानकांनुसार सातत्याने राखण्यासाठी अवलंबिलेल्या विविध उपाययोजना व्यतिरिक्त मुलभूत नागरी समस्यांचे समूळ उच्चाटन होण्याचे दृष्टीकोनातून कार्यान्वित असलेल्या कृती कार्यक्रमाव्दारे प्रामुख्याने पाणीपुरवठा, मलनिःसारण तसेच घन कचरा व्यवस्थापन इत्यादी संदर्भात किमान आवश्यक क्षमता निर्माण करण्यात आलेली आहे.

शहराचा शाश्वत विकास करताना त्यासाठी मैत्रीपूर्ण पर्यावरण आणि शहराच्या वाढीची मर्यादा यांचा आवश्यक तो समतोल राखून शहराचा भविष्यातील विकास कार्यक्षमपणे व यशस्वीरित्या हाताळता येईल, अशा रितीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# अ) दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक-सन २०११-१२

## • प्रमुख जमा बाबी :-

### (१) आयातकर -

- पुणे शहरात बिगर जकात आयात होणारे सोने व चांदी यांची कडक तपासणी सुरु केल्याने तसेच सोने व्यावसायिकांकडून मागविण्यात आलेली उलाढालीची माहिति त्यांचेकडून सादर न झाल्याने एकूण ५७ व्यावसायिकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले. सन २००३ ते सन २०१० या ७ वर्षाच्या कालावधीत सोन्या-चांदीवर एकूण रक्कम रुपये १३.९३ कोटी जकात उत्पन्न मिळालेले होते. सोन्या-चांदीवर कमाल दराने उगवणी केल्याने त्यापोटी चालू आर्थिक वर्षात म्हणजेच माहे एप्रिल २०११ ते माहे फेब्रुवारी, २०१२ अखेर रक्कम रुपये १६ कोटी ३३ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे.

- हद्दीबाहेर जाणाऱ्या मालाला ९०% परतावा (रिफंड) देण्यात येत असून, १०% मिळणारी रक्कम ही रहदारी फीपेक्षा निश्चितच जास्त आहे. या उपाययोजनांमुळे अनधिकृतपणे / रहदारी पास घेऊन बिगर जकात आयात होणाऱ्या मालाचे प्रमाण कमी झाले आहे.

- सिमेंट या मालावर १००% जकातकर आकारणी केली जात असल्याने उत्पन्नात मोठी वाढ होत आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून मार्गस्थ होणाऱ्या प्रत्येक इंधनावर चालणाऱ्या वाहनांकडून देखरेख शुल्क (रहदारी फी) याबाबतच्या सुधारीत दर दर्शविणाऱ्या शेड्यूल एस च्या तक्त्यास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २०१८, दिनांक ३१/०१/२००९ व मा. मुख्य सभा ठराव क्रमांक ४९९, दिनांक १२/०२/२००९ अनुसार मान्यता मिळालेली असून त्यानुसार रहदारी शुल्क रक्कम रुपये २००/- इतके आकारण्यात येत आहे. त्यामुळे माहे जानेवारी, २०१२ अखेर रहदारी शुल्कापोटी रक्कम रूपये ११५.०४ कोटी इतके उत्पन्न मिळालेले आहे.

- प्रचलित आयातकर बाजारभाव यादीतील एकूण ७३ वस्तूंचे दर चालू बाजारभावानुसार अद्ययावत केले. तसेच काही वस्तूंचा नव्याने बाजारभाव यादीमध्ये समावेश करण्यास महापालिका आयुक्त ठराव क्रमांक ६/८९, दिनांक ०७/१२/२०१० नुसार मान्यता मिळालेली आहे. बाजारभाव यादी वाढलेल्या किंमतीनुसार तयार करण्यात आलेली असून, मालाच्या किमतीत वाढ झाल्याने जकातीच्या उत्पन्नात वाढ दिसून येत आहे. सदरच्या दुरूस्त बाजारभाव यादीची अंमलबजावणी आयातकर कार्यालयाकडील कार्यालय परिपत्रक जावक क्रमांक ओ/७१४७, दिनांक ०५/०१/२०११ नुसार दिनांक १०/०१/२०११ पासून सुरु करण्यात आली आहे. ज्यामुळे जकातीच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

- सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी किमान व कमाल दरांअंतर्गत जकातकर नियमावली, २००८ मधील अनुसूचि-१ नियम ४ मधील अनुक्रमांक १३ चांदी व अनुक्रमांक २५ सोने या मालाच्या किमान दराने जकात कर उगवणीस मा. मुख्य सभा ठराव क्रमांक ४७१, दिनांक ११/०२/२०११ व महापालिका आयुक्त ठराव क्रमांक ८/७५०, दिनांक २९/०३/२०११ नुसार मान्यता मिळालेली आहे.

- सध्या दर दिवशी सरासरी सर्व जकात नाक्यांवर अंदाजे एकूण ८,००० रहदारी पासेस होत आहेत. त्यानुसार दर दिवशी किमान १६,००० रहदारी पासांची स्टेशनरी कार्बनसहित लागते. याचा विचार करता, दरवर्षी अंदाजे ६० लक्ष स्टेशनरी खर्च होत आहे. त्यामुळे स्थळ प्रतीचे आकारमान कमी केल्यास कमी वेळात आयातदारास पास देणे शक्य होऊन वाहतुकीस विलंब लागणार नाही. तसेच कागदासारख्या महत्वाच्या स्टेशनरीची बचत होऊन कार्बनचा वापर होणार नसल्याने पर्यावरणाचा समतोल राखणेसही मदत होईल व स्थळप्रतीची नोंद संगणकात स्कॅन करून हव्या त्या वेळेस त्याची प्रिंट काढता येणे शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे अभिलेख साठवून ठेवण्यासाठी जागेचाही प्रश्न उद्भवणार नाही. यासाठी प्रस्तुत प्रकरणी अतिरिक्त महापालिका आयुक्त ठराव क्रमांक ८/१००९, दिनांक १५/११/२०११ अन्वये मान्यता मिळालेली असून प्रचलित रहदारी पासचे (Transit Pass) आकारमान कमी करून स्थळ प्रत न ठेवता सदर पास आयातदारास देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

- आयातकर कार्यालयाकडील कामकाजात अधिक पारदर्शकता निर्माण होण्याच्या दृष्टीने प्राथमिक स्वरूपात ६ मुख्य जकातनाक्यांवर व आयातकर मुख्य इमारतीत **CCTV** कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

- पुणे महानगरपालिका हद्दीत बिगरजकात माल आयात करणाऱ्या आयातदारांवर वचक बसावा, या हेतूने पुणे महानगरपालिका हद्दीत सोने, चांदी, स्टेशनरी माल, बांधकामास लागणारे साहित्य, संगणक साहित्य, सॉफ्टवेअर इत्यादी तसेच इतर माल आयात करणाऱ्या आयातदारांकडून मागणी नोटीसांद्वारे माहिती मागविण्याची व सदर माहितीची तपासणी करण्याची कार्यवाही आयातकर कार्यालयामार्फत सुरु आहे.

(२) मिळकत कर –

- सन २०११–१२ साठी जललाभ कर, जलनिस्सा:रण लाभ कर इत्यादीमध्ये ३४% इतकी दरवाढ सुचवून सुमारे रक्कम रूपये १३९ कोटी व निवासी मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम ठरविताना देण्यात येणारी ४०% सवलत काढून घेणे, यामुळे सुमारे रक्कम रूपये ५० कोटी अशी एकूण सुमारे १८९ कोटी रूपये इतकी दरवाढ सुचविण्यात आली होती. मात्र मा. स्थायी समिती व मा. मुख्य सभेने सदरच्या दरवाढीस मान्यता न देता सन २०१०–११ या आर्थिक वर्षाचेच मिळकतकराचे दर कायम ठेवण्यास मान्यता दिली. **सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ अखेर रक्कम रुपये ४९१ कोटी इतका विक्रमी मिळकत कर वसूल झालेला आहे.**

- सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये दरवाढ सुचविली नसली तरी मिळकतकर थकबाकी वसूल करणेसाठी सुरूवातीपासूनच स्वतंत्र मिळकतकर वसुली पथके तयार करून मिळकतकर थकबाकी वसूल करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याप्रमाणे आकारणी न झालेल्या नवीन मिळकती मिळकतकराच्या जाळ्यामध्ये आणण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आल्यामुळे **चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत मागील आर्थिक वर्षापेक्षा दरवाढ न करता देखील सुमारे रूपये ७३ कोटींपेक्षा जास्त मिळकत कर वसूल करण्यात आलेला आहे.**

- कलम १४० ब अनुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजना या अनुषंगाने पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (Rain Water Harvesting), गांडूळ खत प्रकल्प, सौर उर्जेचा वापर, इत्यादी पर्यावरणानुकूल योजनांना चालना देण्यासाठी अशा योजना राबविण्यात येणाऱ्या निवासी मिळकतींना सवलत देण्यात येते.

- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४० अ नुसार माहे एप्रिल व मे मध्ये मिळकतकराची संपूर्ण रक्कम (थकबाकीसह) आगाऊ भरणाऱ्या मिळकतधारकास सर्वसाधारण करामध्ये देण्यात येणाऱ्या ५% व १०% सवलत योजनेचा लाभ अनेक मिळकतधारक मोठ्या प्रमाणावर घेत असल्यामुळे सन २०११–१२ मध्ये पहिल्या दोन महिन्यातच सुमारे ५५% इतका मिळकत कर महापालिकेकडे जमा झालेला आहे. यामुळे उर्वरित १० महिन्याच्या कालावधीमध्ये मिळकतकर न भरणाऱ्या मिळकतधारकांवर लक्ष केंद्रीत करण्यास मदत होते.

## (३) बांधकाम परवानगी व विकास शुल्क

- २०११–१२ या आर्थिक वर्षात माहे जानेवारी २०११ अखेर विकास शुल्कापोटी रक्कम रुपये ५०,०२,३३,९२२/– जमा झालेले आहे. बांधकाम प्रस्ताव संमत करताना पुणे मनपा मान्य विकास नियंत्रण नियमावलीनुसार जिना, पॅसेज, लिफ्ट इत्यादीच्या क्षेत्रावर प्रिमिअम आकारून चटई क्षेत्र मुक्त करण्याची तरतूद आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात चटई क्षेत्र मुक्त करण्यात आलेल्या क्षेत्राचे प्रिमिअमपोटी रक्कम रुपये ३९९,३६,०६,५४७/– जमा झालेले आहे.

- सन २०११–१२ मध्ये माहे जानेवारी, २०११ अखेर एकूण ३,८७३ बांधकाम प्रस्ताव संमत करण्यात आलेले आहे. सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये बांधकाम विकास विभागासाठी एकूण रक्कम रुपये ५२९.१५ कोटीचे उद्दिष्ट देण्यात आले असून माहे जानेवारी, २०११ अखेर रक्कम रुपये ४९८.३२ कोटी महसूल जमा झालेला आहे.

## (४) पाणी पट्टी

- सन २००० पासून पुणे शहरास होणारा पाणी पुरवठा मीटर पध्दतीने रद्द करुन मिळकत करामध्ये पाणीपट्टी समाविष्ट करण्यात आलेली आहे. तथापि, काही मिळकतींना (घरगुती, व्यावसायिक) पाणी पुरवठा मीटर पध्दतीने करण्यात येतो. अशा ग्राहकांना सन २००० पासून होणाऱ्या पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यात आली नव्हती. पाण्याच्या वापरानुसार पाणीपट्टी आकारणी केल्याने पाण्याचा अपव्यय टळून पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होणार आहे. त्यामुळे पाण्याच्या वापरानुसार पाणीपट्टीची आकारणी करणे आवश्यक आहे. आगामी वर्षात याबाबत पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

- दरवर्षी सरासरी अंदाजे रक्कम रुपये ५५ ते ६० कोटी इतकी पाणीपट्टी जमा होते व त्याप्रमाणात यंदाच्या वर्षीही रक्कम रुपये ६५ कोटी इतकी पाणीपट्टी वसूल करणे अपेक्षित आहे. सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये थकबाकी वसूल करणेसाठी वेळोवेळी ग्राहकांना नोटीसा देण्यात येऊन स्वतंत्र सल्लागाराची नेमणूकही करण्यात आली होती. सदर सल्लागार यांना चुकीच्या बिलांवर दिसून येत असलेल्या थकबाकीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले होते. त्यानुषंगाने रक्कम रुपये २ कोटी समायोजित करण्यात आलेली आहे.

## (५) आकाशचिन्ह परवाना शुल्क

- सन २०११–१२ मध्ये नविन आकाशचिन्ह धोरण तयार करून राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले असून सदर धोरणाची अंमलबजावणी झाल्यास महानगरपालिकेस एकूण सुमारे रक्कम रुपये ५० कोटी इतके वार्षिक उत्पन्न मिळू शकते.

## सन २०११–१२ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| | | (आकडे रूपये कोटीत) |
|---|---|---|
| **जमा बाजू** | | |
| **अर्थशिर्षक** | **२०११–१२ साठीचे जमेचे उद्दिष्ट** | **माहे डिसेंबर २०११ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरुवातीची शिल्लक | ११.०१ | |
| आयातकर | १२५३.५० | ८११.४० |
| मिळकत कर | ६१५.२५ | ३८३.३० |
| पाणीपट्टी (मीटर) | ११३.२० | २७.९९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ५२५.०० | ४३८.९१ |
| इतर जमा | ३०८.६९ | १५६.९४ |
| JNNURM अनुदान | ३८६.४० | १७४.४३ |
| शासकीय अनुदान | ३३.९५ | ३३.२९ |
| कर्ज | ००.०० | ००.०० |
| **एकूण रक्कम रुपये** | **३२४७.००** | **२०२६.२६** |

## • विकास योजना प्रगती आढावा :–

### (१) पाणी पुरवठा

खडकवासला धरण ते वारजे जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत तसेच पर्वती जलशुध्दीकरण केंद्रादरम्यान टाकण्यात येणाऱ्या २५०० मी. मी. व्यासाच्या दाबनलिकेची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. वितरण व्यवस्थेमध्ये नियंत्रण ठेवण्यासाठी अद्यापपर्यंत प्रमुख साठवण टाक्यांवर–जलमापक बसवण्यात आलेले आहेत. ज्यामुळे सदर टाक्यांमधून होणाऱ्या पाणी पुरवठयाबाबत माहिती संकलन करणे व नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. साठवण टाक्यांमध्ये साठलेला गाळ काढणेकामी स्वयंचलित यंत्रामार्फत गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. पर्वती जलशुध्दीकरण केंद्राच्या शेजारी असलेल्या जागेमध्ये ५०० एमएलडी व वडगाव जलशुध्दिकरण केंद्रा शेजारी २५० एमएलडी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र उभारणे कामी अहवाल तयार करण्याचे काम सल्लागार संस्थेकडून करण्यात आलेले आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्र उभारण्याचे काम पुढील आर्थिक वर्षात सुरु करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त वारजे जलशुध्दीकरण केंद्र वाढीव क्षमतेसाठी खडकवासला धरणापासून १५०० मी. मी. व्यासाची दाबनलिका टाकण्याचे काम यावर्षी सुरु करण्यात आलेले आहे. सदरचे काम येत्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण करुन वारजे जलशुध्दीकरण केंद्र ४०० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेने कार्यान्वित करण्यात येणार आहे. शहरात असलेल्या विविध जुन्या जलवाहिन्या बदलून नविन जलवाहिन्या टाकण्याचे काम करण्यात आलेले आहे. जेणेकरुन पाण्याची समस्या सोडविणे शक्य झालेले आहे.

**जलमापक बसविणे –**

पुणे शहरास होत असलेल्या पाणी पुरवठ्याचे मोजमाप करणेसाठी मोठ्या प्रमाणात जलमापक बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. एकूण ४७ विविध साठवण टाक्यांमधून होणारा पाणी पुरवठा मोजण्याकरिता अद्यापपर्यंत २० साठवण टाक्यांवर अद्ययावत जलमापक बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे स्वतंत्र विभागात होणारा पाणी पुरवठा मोजणे शक्य होत आहे. उर्वरित साठवण टाक्यांसाठी अद्ययावत जलमापक बसविण्याचे काम पुढील अंदाजपत्रकात हाती घेण्याचे नियोजन आहे.

**समान पाणी वाटप योजना –**

पुणे शहराची लोकसंख्या व त्यानुषंगाने होणारा पाणी पुरवठा लक्षात घेता सरासरी दरडोई मानकापेक्षा जास्त पाणी पुरवठा होतो. असे असतानासुध्दा, वेळोवेळी असमतोल पाणी पुरवठ्याबाबत चर्चा होत असल्याचे निदर्शनास येते. ही बाब लक्षात घेता, सन २०१२ या सालात समान पाणी वाटप योजना करणेकामी सल्लागारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरात असलेल्या जलवाहिन्यांबाबतचा अभ्यास करुन गळती शोधणे, गळती थांबविणे व इतर उपाययोजना करुन शहरास दरडोई किमान १५० लिटर पाणी पुरवठा होणेकामी योजना तयार करावयाची आहे. सदरची योजना केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम किंवा तत्सम वित्तीय संस्थेकडून मान्यता घेवून येत्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये राबवावयाची आहे. सध्या सल्लागारामार्फत शहरातील जलवाहिन्यांच्या जाळ्याबाबत अभ्यास सुरु करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रकल्प अहवाल **(Detailed Project Report)** तयार केले जाणार आहेत.

## (२) <u>मल:निसारण</u>

मलनिःसारण JNNURM योजनेअंतर्गत सुचविण्यात आलेले खराडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे. पुणे शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करून नदीत सोडणेकामी रक्कम रुपये ७१५ कोटींची योजना मे. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडे सादर करण्यात आलेली आहे. कोंढवा भागातून येत असलेल्या भैरोबा नाल्यामध्ये मुख्य मलवाहिनी टाकण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. रक्कम रुपये ७१५ कोटीच्या योजनेमध्ये १० ठिकाणी मलनि:सारण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव असून त्यांची एकूण क्षमता ३८३ दशलक्ष लिटर एवढी असणार आहे. याव्यतिरिक्त अंदाजे ७३ कि. मी. ची मुख्य मलवाहिनी टाकणे व ४० कि. मी. लांबीच्या छोट्या मलवाहिन्या टाकण्याचे काम प्रस्तावित आहे.

सन २०११–१२ मध्ये नायडू मैलापाणी शुध्दीकरण केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आलेले आहे व खराडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येत्या काही दिवसात कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरात निर्माण होणाऱ्या अंदाजे ७५% मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणे शक्य होणार आहे.

## (३) <u>घन कचरा व्यवस्थापन</u>

- **पुणे शहरामध्ये उभारण्यात आलेले प्रकल्प खालीलप्रमाणे :–**

१. उरूळी देवाची/फुरसुंगी येथे मे. हंजर बायोटेक – प्रतिदिन १००० मे. टन
२. हडपसर व्हर्मिकंपोस्ट प्रकल्प– प्रतिदिन २०० मे. टन
३. रामटेकडी व्हर्मिकंपोस्ट प्रकल्प प्रतिदिन १०० मे. टन
४. विविध ठिकाणी बायोगॅस प्रकल्प–प्रतिदिन ५८ मे. टन. (५ मे. टन–११ व ३ मे. टन १ प्रकल्प)
५. मेकॅनिकल कंपोस्टिंग प्रकल्प–प्रतिदिन ४ मे. टन (२ मे. टन–२ प्रकल्प)

- शहरातील सध्या कार्यरत असलेल्या घन कचरा प्रकल्पामधील साप्ताहिक सुट्टी, विद्युत पुरवठयामधील अडचणी, दैनंदिन देखभाल दुरूस्ती, प्रकल्प अचानक बंद पडणे, स्थानिक रहिवाशांचा विरोध व इतर येणाऱ्या अडचणी लक्षात घेता घन कचऱ्याशी संबंधित प्रकल्पाची कार्यक्षमता ७०% पर्यंत गृहित धरावी लागणार आहे. त्यानुसार भविष्यातील लोकसंख्या वाढ व त्याअनुषंगाने होणारी कचरा वाढ लक्षात घेऊन हडपसर, रामटेकडी औद्योगिक वसाहतीमध्ये ७०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून वीजनिर्मिती करण्याचा प्रकल्प बी. ओ. टी. तत्वावर उभारण्याचे काम सुरू असून, सदर प्रकल्प माहे मार्च, २०१२ पर्यंत कार्यान्वित होईल.

- पुणे महानगरपालिका हद्दीत २ मे. टनाचे २ मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प कार्यान्वीत असून, या दोन्ही प्रकल्पांमधून सुमारे ४ मे. टन ओल्या कचऱ्यावर दररोज प्रक्रिया केली जाते व या प्रकल्पांमुळे कचऱ्याची विल्हेवाट लावणे सोयीचे व उपयुक्त झालेले आहे.

- शहरात निर्माण होणारा उद्यानांमधील कचरा, नारळ व शहाळी अशा प्रकारचा कचरा श्रेडर मशिनद्वारे बारीक करण्यात येत असून, शहरातील एकूण ३ ठिकाणी सदरची श्रेडर मशिन्स बसविण्यात आलेली आहेत. याशिवाय अजून ४ ठिकाणी श्रेडर मशीन्स बसविण्याची प्रक्रिया सुरु असून माहे मार्च, २०१२ अखेरपर्यंत सदरची मशिन्स कार्यन्वित होतील. शहरात अशा प्रकारे ३० ते ३५ मे. टन कचऱ्यावर दररोज प्रक्रिया केली जाते. त्याचा मुख्यतः उपयोग उद्योगांमध्ये खतासाठी केला जातो. तसेच गणेशोत्सव काळात निर्माण झालेल्या मोठया प्रमाणावरील कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट लावण्यात आलेली आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा नियंत्रण अध्यादेश, २००६ यातील कलम १८ चे पोटकलम ३ चा खंड १ आणि कलम ४ चे पोटकलम १ व २ नुसार ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी आहे. कमी जाडीच्या प्लॅस्टिक बॅगच्या वापरावर कार्यवाही करणेसाठी प्रशासनाने याबाबत आतापर्यंत १६,०१८ जणांवर कारवाई करुन २५,०७,२७५/– इतकी रक्कम दंड म्हणून वसूल केलेली आहे व सुमारे १९,१९४ किलो प्लॅस्टिक पिशव्या जप्त केल्या आहेत.

## (४) <u>आरोग्य</u>

- शहरातील नागरिकांना २९ बाहयरूग्ण विभाग, २ फिरते दवाखाने, १ सर्वसाधारण रूग्णालय, १ सांसर्गिक रोग रूग्णालय, १४ प्रसूतिगृहे, १ पॉलिक्लिनिक याद्वारे एकूण ९७६ बेडसमार्फत विविध आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

- कमला नेहरू रूग्णालय हे पुणे मनपाचे मोठे जनरल रेफरल व टिचिंग हॉस्पिटल आहे. रूग्णालयाचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण करण्यात आले असून सदरचे रुग्णालय पुणे मनपाच्या स्वतंत्र वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न करण्यात येणार आहे. रुग्णालयामध्ये यावर्षी नवीन २३० बेडसची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वीचे २२० बेडस व नविन २३० बेडस असे एकूण ४५० बेडसचे विविध वैद्यकीय विभागाचे मिळून सर्वसाधारण सर्वोपचारी रूग्णालय तयार झालेले आहे. सदर रुग्णालयात १० बेडसचे अतिदक्षता विभाग, **4 Modular Operation Theatres Digital Radiography Machines** बसविणे आहे. रूग्णालयाला सेंट्रल ऑक्सिजन गॅस पाईप लाइन उपलब्ध करुन देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच आवश्यक कर्मचारी उपलब्ध होताच २४ तास **Casualty** सेवा व १० बेडस **ICU** विभाग सुरू करण्यात येईल.

- डॉ. नायडू सांसर्गिक रोग रूग्णालयाची अद्ययावत अशी पाच मजली इमारत बांधून पूर्ण झालेली असून या रुग्णालयामध्ये १४० बेडस तयार आहेत. सदर रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न करण्यात आले असून त्याप्रमाणे ते विकसित केलेले आहे.

- भारतरत्न स्व. राजीव गांधी रूग्णालय, येरवडा येथील ५ मजली स्वतंत्र इमारतीमध्ये १८० बेडस आहेत. सदर रूग्णालय हे वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न करण्यात येणार आहे. तसेच जनरल हॉस्पिटल करण्याच्या दृष्टीने ते विकसित करण्यात आले आहे.

- कै. जयाबाई नानासाहेब सुतार प्रसुतिगृह, कोथरूड याठिकाणी नेत्र चिकित्सा विभाग, दंत चिकित्सा विभाग व नाक कान घसा विभाग **(ENT)** सुरू करण्यात आलेला आहे.

- यावर्षी छत्रपती शाहू महाराज हॉस्पिटल, केदारीनगर, कै. बिंदू माधव ठाकरे हॉस्पिटल, गोसावी वस्ती, कोथरूड व अतुलनगर, वारजे येथील बाहयरूग्ण विभागात तसेच केळेवाडीतील कै. सुंदराबाई गणपतराव राऊत दवाखाना येथे आंतररूग्ण विभाग सुरू करण्यात आलेला आहे.

- **कीटकजन्य आजारांवर नियंत्रण–किटक प्रतिबंधक विभाग :–**

  संपूर्ण शहरात इनडोअर अळीनाशक कार्यक्रम **Zero Mosquito** राबविण्यात येत आहे. शहरातील १४ कीटक प्रतिबंधक विभागाचे कोठ्यांकडे एकूण २८० कर्मचारी ठेकेदारी पद्धतीने नेमले आहेत. प्रत्येक कर्मचारी दररोज २५० घरातील पाणी साठ्यांमध्ये अळीनाशक औषध टाकत आहेत, त्यामुळे घरातील साठविलेल्या पाण्यांत होणारी डासांची पैदास थांबविणे शक्य झाल्याने डेंगू, चिकनगुनिया, हिवताप अशा रुग्णांची संख्या आटोक्यात येत आहे.

- **माता व बाल आरोग्य :–**

  १. प्रसूतीपूर्व नोंदणी व तपासणीअंतर्गत १२ आठवडयातील नोंदणीकरिता नर्सेसमार्फत आवश्यक ती माहिती देण्यात आली व नोंदणी वाढविण्यात आली.

  २. नवजात शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत वैद्यकीय अधिकारी व नर्सेसला प्रशिक्षण देणारी पुणे महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका आहे.

  ३. कमला नेहरू येथे नवजात शिशु अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आले.

  ४. शासनाच्या धोरणाप्रमाणे माता मृत्यू अन्वेषण सुरू करण्यात आले असून त्यासाठी पुणे महानगरपालिकेचे स्वतःचे पॅनेल स्थापन करण्यात आलेले आहे.

| २०११– २०१२ निर्देशांक | जानेवारी २०१२ अखेर झालेले काम |
|---|---|
| प्रसूतिपूर्व नाव नोंदणी | ४७,३५१ |
| नाव नोंदणी–१२ आठवडयाच्या आत | ३७,८८० |
| रक्तक्षय प्रतिबंधक गोळया वाटप | ४७,३५१ |
| रूग्णालयातील बाळंतपण | ४३,५९९ |
| मुलांना रक्तक्षय प्रतिबंधक गोळया वाटप | १,७८,१७९ |
| माता मृत्यु | २५/१००००० |
| बाल मृत्यू | ३२/१००० |

- **कुटुंब कल्याण कार्यक्रम :-**

  - **लोकसंख्या नियंत्रण–**प्रत्येक प्रसूतीगृहामध्ये दुर्बिणद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया होण्याच्या दृष्टीने एक मोबाईल टीम तयार करण्यात आली असून सदर टीमला एक लॅप्रोस्कोपही उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

## (५) नगर नियोजन

- नगर नियोजनांतर्गत सन १९८७ मधील विकास आराखडयाचे पुनर्विलोकनाचे तसेच नविन हद्दीतील २३ गावांचे भूमापन सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- जुन्या हद्दीच्या मंजूर विकास आराखडयाच्या पुनर्विलोकनाच्या दृष्टीने जुन्या हद्दीतील रस्त्यांचे, आरक्षणांचे प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाचे कामही पूर्ण करण्यात आलेले आहे.

- **बांधकाम विकास**

  संगणकीकृत प्रणाली ॲटो डी.सी.आर. चा वापर गेली ५ वर्षे सुरू आहे. त्याचा पुढचा भाग म्हणून विविध मान्यतेचे नकाशे मनपामार्फत संगणकीय प्रिंटद्वारे देण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. पुणे महानगरपालिकेकडे प्रस्ताव दाखल करण्यापूर्वी लायसेन्स आर्किटेक्ट/लायसेन्स इंजिनिअर यांनी तयार केलेले नकाशे यांची विकास नियंत्रण नियमावलीनुसार छाननी करून अहवाल पाहण्यासाठी **Online Pre-approval Process** विकसित करण्यात आलेली आहे. या प्रणालीच्या वापरामुळे लायसेन्स आर्किटेक्ट यांना त्यांच्या कार्यालयातून नकाशे दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच या प्रणालीचा वापर करून सुमारे ३५५२ प्रस्तावांची छाननी करून लायसेन्स आर्किटेक्ट यांना त्यांचे अहवाल पाहण्याची व्यवस्था पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर करण्यात आलेली आहे. या प्रणालीमध्ये नोंदणीकृत असलेल्या सुमारे ३७६८ लायसेन्स आर्किटेक्ट / लायसेन्स इंजिनिअर्स /स्ट्रक्चरल इंजिनिअर्स यांचे Login ID व Password तयार करण्यात आले असून ते संबंधितांना वितरित करण्यात आलेले आहेत. यामध्ये कौन्सिल ऑफ आर्किटेक्टचे प्रमाणपत्र आर्किटेक्ट १७३२ व पुणे म.न.पा.चे नोंदणीकृत इंजिनिअर १६२९ तसेच रजिस्टर्ड स्ट्रक्चरल इंजिनिअर्स ४०७ असे एकूण ३७६८ आहेत. तसेच Internet व्दारे संकेतस्थळाच्या माध्यमातून प्रस्ताव दाखल करताना Secured Login करिता Digital Signature संबंधित लायसेन्स आर्किटेक्ट/लायसेन्स इंजिनिअर्स यांना देण्यात आलेल्या आहेत.

- **गावठाण भागातील जुन्या वाडयाचे सर्वेक्षण**

  पुणे शहरातील गावठाण क्षेत्रामध्ये ५०–६० वर्षापूर्वीचे धोकादायक स्थितीत जुने वाडे आहेत. या वाड्यांच्या स्ट्रक्चरल सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आलेले आहे. तसेच धोकादायक असलेल्या सर्व जुन्या मिळकती दुरूस्तीविषयक कार्यवाही सुरू असून ज्या वाड्यांचा भाग अत्यंत दुरावस्थेत आहे, अशा ठिकाणी मिळकती उतरवून घेण्याविषयी कार्यवाही सुरू करण्यात येत आहे. तसेच इमारतीचे संदर्भांत मा. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नियमावली तयार करणे व कार्यपध्दतीस मान्यता मिळविणे इत्यादी बाबींवर कार्यवाही सुरू आहे. तसेच एकूण १६४१ जुन्या वाड्यांचा सर्व्हे करण्याचे काम आजमितीस करण्यात आलेले आहे.

- **इको हाउसिंग संकल्पना**

  जागतिक पातळीवर पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने विविध पर्याय व योग्य त्या पर्यायांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने हरितगृह वायूंचे उत्सर्जन रोखणे व आवश्यक त्या ठिकाणी उत्सर्जन कमी करणेचा समावेश आहे. याकरिता मातीचे संवर्धन, वृक्षलागवड यासारखी धोरणे राबवावी लागणार आहेत. पुणे मनपाही इको हौसिंग सारखे प्रस्ताव शहरात राबवून या प्रयत्नांमध्ये सहभागी आहे. इको हौसिंग संकल्पना शहरातील बांधकाम प्रकल्पांमध्ये राबवून कमीत कमी वीज वापर होईल, नागरिकरणामुळे जमिनीच्या मातीच्या थरांमध्ये कमीत कमी बदल होईल याबाबत उपाययोजना करणे तसेच इको हौसिंग संकल्पनेच्या सुधारीत मानंकानुसार पुणे मनपा क्षेत्राचा शाश्वत विकास करणे याकरीता जास्तीत जास्त बांधकामे पर्यावरणदृष्टया अनुकूल असावीत, यादृष्टीने पुणे मनपा प्रयत्नशील आहे.

## (६) भू–संपादन व व्यवस्थापन

**ॲमेनिटी स्पेसचे ताबे व ॲमेनिटी स्पेस वापराचे नियोजन :**

- सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये सुमारे ४७ ॲमेनिटी स्पेसचे ताबे घेण्यात आलेले असून त्याद्वारे अंदाजे १०.७० हेक्टर सुविधा क्षेत्र पुणे मनपाचे ताब्यात आलेले आहे.
- ताब्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसच्या जागा विनावापर राहू नयेत, याकरीता ॲमेनिटी स्पेस नियोजन समितीमार्फत ॲमेनिटी स्पेस विनियोगाबाबत निर्णय घेण्यात येऊन त्यानुसार या जागा वापरात आणण्यात येत आहेत.
- सन २०११–१२ या आर्थिक वर्षात भूमीप्रापण कार्यालयामार्फत भूसंपादनाचे जवळपास १५ प्रस्ताव भूसंपादनाच्या अंतिम टप्प्यावर असून, विभागीय आयुक्त, पुणे विभाग व शासनाने हे प्रस्ताव मंजूर केल्यानंतर त्यापोटी जवळपास १०० कोटी इतकी रक्कम आदा करावी लागणार आहे.
- भूमीप्रापण खात्याने नगररोड व खराडी बायपास या रस्त्यावरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे प्राधान्याने काढून रस्ते विकासाला प्राधान्य दिलेले आहे.
- अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या जितेंद्र अभिषेकी उद्यानाचा प्रस्ताव फक्त ४ महिन्यांमध्ये शासन स्तरावर अंतिम मंजूरीसाठी पाठविलेला आहे. त्यासाठी आवश्यक असणारी रक्कम विशेष भूसंपादन अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे.
- पांचगांव पर्वती येथील भूसंपादन झालेली परंतु महानगरपालिकेच्या ताब्यात नसलेल्या जमिनींस महापालिकेचे नांव भूमीप्रापण कार्यालयामार्फत लावण्यात आलेली आहे.
- पुणे विद्यापीठ ते बालेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील अतिक्रमणे भूमीप्रापण कार्यालयाकडून काढण्यात आली असून तेथे रस्तारुंदी करण्यात आलेली आहे.
- सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये एकूण ३५ रस्त्यांची अंतिम मोजणी करुन असे प्रस्ताव विशेष भूसंपादन अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.

## (७) पथ व वाहतूक नियोजन

- पुणे शहर हे देशात सहाव्या क्रमांकाचे मोठे शहर असून शहराची सध्याची लोकसंख्या सुमारे ३१.१५ लक्ष इतकी आहे. शहरी लोकसंख्येच्या मानाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे अत्यंत आवश्यक आहे.

- शहरातील एकंदरीत वाहतूक व्यवस्था सुधारणे तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेस प्राधान्य देणे या दृष्टीकोनातून एक सर्वंकष वाहतूक आराखडा (**Comprehensive Mobility Plan**) तयार करून मा. मुख्य सभेची मंजूरी मिळणेसाठी सादर केला आहे.

- वाहतूक सुधारणे अंतर्गत मान्य विकास आराखड्यामध्ये नदीकाठाने दर्शविण्यात आलेला शिवणे ते खराडी या दरम्यानच्या रस्त्याचे काम प्राधान्याने हाती घेणेत आलेले असून, या कामासाठी डिफर्ड पेमेंट पध्दतीने निविदा मागवून सदरचे काम सुरू करणेत आलेले आहे.

- शहरातील वाहनतळ समस्या विचारात घेवून पुणे स्टेशन परिसरामध्ये वाहनतळ उपलब्ध करणेच्या दृष्टीकोनातून मोलेदिना हॉल येथील वाहनतळाचे काम हाती घेणेत आलेले असून या ठिकाणी सुमारे ४२५ चारचाकी व ९८० दुचाकी वाहनांसाठी वाहनतळ सुविधा उपलब्ध करण्याची अंमलबजावणी प्रगतीत असून, सदर काम माहे मार्च, २०१२ अखेर पूर्ण होईल.

- पादचारी नागरिकांना रस्ता ओलांडणे सोयीचे व्हावे या दृष्टीकोनातून पुणे सातारा रस्त्यावरील साईबाबा मंदीर, सेनापती बापट रोड चतु:श्रृंगी मंदीर तसेच शिवाजीनगर कोर्ट या ठिकाणी भुयारी मार्ग बांधणेचे तसेच खडकी रेल्वे स्टेशन येथे रेल्वे ट्रॅक ओलांडणेसाठी औंध रोड (स्पायसर कॉलेजकडे जाणारा) व मुंबई पुणे रस्त्याला जोडणारा पादचारी पूल **(FOB)** बांधण्याचे नियोजन असून त्यासाठी कार्यादेशही देण्यात आलेले आहेत.

- वाहतूक गतीमान होण्याचे दृष्टीकोनातून बंडगार्डन येथील पूलाचे काम पूर्ण करणेत आलेले असून पूल विना सिग्नल वाहतुकीस खुलाही करणेत आलेला आहे तसेच मुळा नदीवरील जुना अस्तित्वातील होळकर पूल वाहतूकीस अपुरा पडत असल्याने या ठिकाणी दोन पूल बांधणेचे नियोजन करणेत येवून त्या अंतर्गत एका पूलाचे काम पूर्ण करून तो वाहतूकीस खुला करणेत आलेला आहे व दुसऱ्या पूलाचे काम प्रगतीपथावर असून माहे मार्च, २०१२ अखेर पर्यंत तो वाहतूकीस खुला करणेचे नियोजन आहे. तसेच चंद्रमा चौक ते होळकर पूल दरम्यान असलेल्या बीईजी कॅम्पसला जोडणारा उडड्राणपूल बांधणेचे काम चालू असून त्यामुळे बीईजी जवळ होणारी वाहतूक कोंडी कमी होणार आहे व विनासिग्नल वाहतूक सुरळीत होणार आहे.

- पुणे शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत स्वारगेट येथील उडड्राणपूल बांधणे या कामासाठी रक्कम रूपये ४० कोटी एवढा निधी जमा करणेत आला असून या ठिकाणी उडड्राणपूल उभारणीच्या कामाची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत सुरू करण्यात आलेली आहे.

- शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे व त्याकरिता पायाभूत सुविधांचा विकास करणे यासाठी जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहर पुर्ननिर्माण अभियानांतर्गत ५०० बसेस खरेदी करावयाच्या असून, त्यापैकी १५० बसेस सन २००९–१० या वर्षात पी. एम. पी. एम. एल. ला उपलब्ध करून देण्यांत आलेल्या आहेत. त्यासाठी रक्कम रूपये ३१,९६,०९,६५०/– एवढा निधी पी. एम. पी. एम. एल. प्रशासनास यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. उर्वरित ३५० बसेस मार्च, २०१२ अखेर खरेदी करण्यांत येणार आहेत. त्यासाठी ५०% अग्रीम रक्कम म्हणून रक्कम रूपये ४७,२५,००,०००/– सन २०१०–११ या वर्षात उपलब्ध करून देण्यात आलेले असून खरेदी प्रक्रिया पी. एम. पी. एम. एल. प्रशासनामार्फत माहे मार्च, २०१२ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहर पुर्ननिर्माण अभियानांतर्गत वरील ५०० बसेस व्यतिरिक्त आणखी १०० बसेस खरेदी करणेस मे. केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाली असून त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## (८) नागरवस्ती विकास योजना

- सन २०११–२०१२ च्या रकमेतून केंद्र व राज्य शासनाची सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना तसेच कल्याणकारी योजनांतर्गत मागासवर्गीय कल्याणकारी योजना, महिला बाल कल्याण योजना, युवक कल्याणकारी योजना, अपंग कल्याणकारी योजना इ. योजना राबविल्या गेल्या. या योजनांतर्गत दारिद्र्य रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातील नागरीकांसाठी खालीलप्रमाणे कल्याणकारी उपक्रम प्रति वर्षी राबविले जातात.

१. **स्वयंरोजगार उपक्रम:–**
यामध्ये प्रामुख्याने व्यवसाय प्रशिक्षण स्वयंरोजगारासाठी अनुदान, उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयांमध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, महिलांसाठी प्रगती महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहर पातळीवर पुणे महानगर समाज विकास संस्था यांचा समावेश आहे.

२. **बचतगटासाठी उपक्रम:–**

बचतगटांना प्रशिक्षण, बचतगटांसाठी फिरता निधी, सावित्री महासंघामार्फत कर्ज, बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी प्रदर्शन व विक्रीसाठी अर्थसहाय्य, शेजार समूह गटातील स्वयंसेविकांना प्रशिक्षण, बचतगटांचे संगणकीकरण, बचतगटांमार्फत मनपा प्रशालेतील मुलांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजन, पुणे मनपा बालवाडीतील मुलांना पोषण आहार इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

३. **महिलांसाठी उपक्रम:–**

महिलांसाठी कुटुंब नियोजनास प्रोत्साहन, विधवांना अनुदान, कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्र, पाळणाघर, समुपदेशन, शिवणवर्ग, स्वयंरोजगारासाठी अनुदान व प्रशिक्षण इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

४. **शैक्षणिक उपक्रम:–**

गुणवत्ता वाढ, इयत्ता १२ वीतील विद्यार्थ्यांना खाजगी क्लासची फी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायकल वाटप, कमवा व शिका, सीईटी परिक्षेसाठी अर्थसहाय्य, उच्च तांत्रिक शिक्षणासाठी अर्थसहाय्य, इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपा माध्यमिक शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्य, बहिस्थ परिक्षांसाठी मार्गदर्शन, मनपा शाळेतील मुलांना मार्गदर्शन इत्यादी शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात.

५. **भौतिक सुविधा उपक्रम:–**

यामध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरूस्ती, विज कनेक्शन, नळ कनेक्शन इत्यादीसाठी अर्थसहाय्य, बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी कायमस्वरूपी आधार विक्री केंद्र यांचा समावेश आहे.

६. **सामाजिक उपक्रम:–**

वृध्दांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसन मुक्तिसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी रात्र निवारा प्रकल्प, बालविकास केंद्र इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

७. **अपंगांसाठी उपक्रम:–**

शैक्षणिक अर्थसहाय्य, मोफत पीएमपीएमल बस पास, कृत्रिम अवयव घेणेसाठी अर्थसहाय्य, स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य असे उपक्रम अपंगांसाठी राबविण्यात येतात.

- सन २०११–१२ या वर्षात वर नमूद केलेल्या तरतुदीतून राबविणेत आलेल्या विविध उपक्रमातून आजपर्यंत सामूहिकरित्या ६५,८०१ लाभार्थ्यांना लाभ देणेत आलेला आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन २०११–२०१२ लाभार्थी संख्या (जानेवारी अखेर) |
|---|---|---|
| १ | स्वयंरोजगार योजना | १२२०० |
| २ | केंद्र व राज्य शासनाची सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना | ९६५० |
| ३ | बचत गटासाठी योजना | ५७९८ |
| ४ | महिलांसाठी योजना | २६४९ |
| ५ | विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना | १६७८९ |
| ६ | भौतिक सुविधा योजना | १० |
| ७ | सामाजिक योजना | १६३३१ |
| ८ | अपंगासाठी योजना | २३७४ |
| | **एकूण** | **६५८०१** |

## (९) <u>उद्यान –</u>

- सन ११–१२ मध्ये उद्यान विभागामधील विविध भागामध्ये वेगवेगळया प्रकारची उद्याने विकसीत करण्यात आली आहेत. त्यामध्ये सहकारनगर येथे पं. भिमसेन जोशी कलादालन, दादासाहेब फाळके ४ डी थिएटर, बाबुराव वाळवेकर उद्यान, बिबवेवाडी येथे आंबेडेकर उद्यान, शनिवार पेठ येथे नाना–नानी पार्क, येरवडा येथे लुबिंनी उद्यान, मुनुरवार सोसायटी, आनंद पार्क सोसा, शरद वाटीका उद्यान,कोथरुड येथे सचिन आंग्रे उद्यान, निळु फुले उद्यान, ज्ञानेश्वरी उद्यान, मातोश्री जिजाऊ बालोद्यान, कर्वेनगर येथे भालेकर उद्यान, जावळकर उद्यान, वारजे येथे ज्ञानेश्वरी उद्यान, बोपोडी येथे नदी किनारी पक्षी विहार केंद्र, रेल्वे स्टेशन परिसरात विल्सन गार्डन, प्रकल्पांची उभारणी करुन नागरिकांना हे उद्यान खुले करण्यात आले आहे.

- पेशवे उद्यान येथे साहसी खेळांची उभारणी करण्यात आली असून त्यास नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये एकूण ४८ साहसी खेळांचा समावेश आहे.

- शहरातील कात्रज येथील स्व. राजीव गांधी प्राणी संग्रहालय हे त्यामधील नावीन्यपूर्ण संकल्पनेमुळे नागरिकांमध्ये अतिशय लोकप्रिय झालेले असून वर्षभरामध्ये अंदाजे १६ लक्ष नागरिकांनी या प्राणी संग्रहालयास भेट दिलेली आहे. तसेच या ठिकाणी नीलगाय व भेकर यांचेसाठी खंदकाचे काम व नागरिकांना प्राण्यांची माहिती होणेसाठी इंटरप्रिटेशन सेंटरचे काम प्रगतीपथावर आहे.

## (१०) <u>विद्युत विभाग –</u>

- कै. यशवंतराव चव्हाण उद्यान, शिवदर्शन येथील चित्रमहर्षि दादासाहेब फाळके फोर डी थिएटर प्रकल्प, कात्रज तलाव येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळा परिसरात आकर्षक विद्युत व्यवस्था, स्वर्गीय राजीव गांधी ई–लर्निंग स्कूल अकादमी येथील वातानुकुलित व ध्वनी यंत्रणा, लिफ्ट इत्यादीबाबतची विद्युतविषयक सर्व कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

- वसंतराव बागुल उद्यान येथे डायनामिक लाईट व साऊंड शो, हजरत सिद्दीकी उद्यान, पुणे कॅम्प येथे तळ्यामध्ये फ्लोटिंग संगीत कारंजे व लेझर शो उभारणे तसेच पु. ल. देशपांडे उद्यान येथील मुघल उद्यान कारंज्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

- पुणे महानगरपालिकेच्या महत्वाच्या इमारतींवर उदा. मनपा मुख्य भवन, नायडू हॉस्पिटल, आयातकर कार्यालय, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, अशा एकूण १० ठिकाणी लाईटनिंग अॅरेस्टर यंत्रणा कार्यान्वित केली आहे व उर्वरित ८ ठिकाणी या यंत्रणेचे काम चालू आहे.

- मुंढवा बायपास, खराडी, नगररोड, सिंहगड रस्ता अशा महत्वाच्या रस्त्यांवरील रस्ता रुंदीकरणास अडथळा ठरणारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडचे विद्युत खांब योग्य त्या ठिकाणी हलवून तेथील उच्चदाब वाहिन्या भूमिगत करण्यात आल्या आहेत.

- मनपाच्या विविध जकात नाक्यांवर व इमारतींवर एलईडी फिटिंग्ज, इंडक्शन फिटिंग्ज व न्यूऑन साईन्स बसविण्यात येऊन विद्युत उर्जेमध्ये बचत करण्यात आलेली आहे.

- **Bureau of Energy Efficiency** मार्फत वॉटर पपिंग, ड्रेनेज पंपिंग व रस्त्यांवरील दिव्यांचे एनर्जी ऑडिट पूर्ण करण्यात आलेले आहे.

## (११) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण–

- पुणे महानगरपालिका संचालित माध्यमिक २१ पैकी ५ कनिष्ठ महाविद्यालयासह सर्व शाळांमध्ये मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाच्या मोफत संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सर्वांगीण विकासाच्या शिक्षण संधी उपलब्ध करुन देणेसाठी महापालिकेकडून आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या वापरातून दर्जेदार व परिणामकारक अध्ययन व अध्यापनाच्या सुविधा निर्माण करुन दर्जेदार शिक्षणाची संकल्पना कार्यान्वित करण्यात आली आहे.

- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल सरासरी ७५% (तीन विद्यानिकेतन माध्यमिक शाळांचा निकाल १००% आहे.) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल सरासरी ५२% आहे. जिल्हा व राज्य स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

- पुणे महापालिका क्षेत्रातील इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शाळेत येण्या–जाण्यासाठी पुणे महापालिकेमार्फत पीएमपीएमएल मोफत बसपास देण्यात येतात.

## (१२) अग्निशामक –

- सन २०११–१२ मध्ये उपलब्ध तरतूदीमधून अग्निशमन दलासाठी ७२ मीटर उंच शिडी असलेले एरियल लायडर प्लॅटफार्म खरेदी करून ताफ्यात समाविष्ट करण्यात आले आहे.
- बाणेर – पाषाण येथे अग्निशमन केंद्र विकसित करण्यात आले आहे.

## (१३) आपत्ती व्यवस्थापन –

- पुणे शहरात आपत्ती उद्‌भवल्यास त्वरीत संपर्क साधण्याचे व संतर्कतेच्या सूचना देण्याकरीता ट्रॅकिंग रेडिओ (वॉकी टॉकी) सेट, एस. एम. एस. पॅकेजिंग सर्व्हिस सेवा आपत्ती व्यवस्थापन कक्षातर्फे सुरू करण्यात आली आहे.
- पुणे महानगरपालिका मुख्य कार्यालय, १४ क्षेत्रिय कार्यालये, सावरकर भवन व मुख्य अग्निशमन केंद्र येथे व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधा उपलब्ध करून देणेसाठी प्रयत्न सुरू आहेत. असा उपक्रम सुरु करणारी पुणे ही राज्यातील पहिली महानगरपालिका आहे.
- अतिवृष्टीमध्ये पुणे शहरातील पाणी साठण्याची ठिकाणे व नाले याठिकाणी नाला व्हिडीओ सर्व्हेलन्स सिस्टिम तयार करण्यात आली असून त्यांचे मॉनिटरींग आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात आले.
- भारत सरकारच्या निर्देशानुसार **''तांत्रिक सुरक्षा कक्ष ''** स्थापन करण्यात आला. आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावतीकरणाचे काम भारत सरकार व संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार सुरू करण्यात आले असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- आपत्ती व्यवस्थापनाची एक दिवसीय कार्यशाळा पुणे मनपातील सर्व विभागीत कर्मचारी / सेवकांकरिता आयोजित करण्यात आली. जागतिक आपत्ती निवारण दिनानिमित्त दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ रोजी **'आपत्ती निवारण पंधरवडा'** साजरा करण्यात आला. यामध्ये आपत्ती विषयक साहित्यांचे प्रदर्शन, जनजागृती, शालेय निबंध व चित्रकला स्पर्धा यांचा समावेश होता. क्षेत्रिय कार्यालयांतील बचाव पथके व अग्निशमन दलाकडील जवान यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रमही राबविण्यात आलेला आहे.

## (१४) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियानांतर्गत प्रकल्प

- नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारासात घेऊन केंद्र शासनाने देशातील ६३ शहरांमध्ये पायाभूत सोयी–सुविधा (UIG) व शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या दोन क्षेत्रांअंतर्गत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम दिनांक ३ डिसेंबर, २००५ रोजी जाहीर केला आहे. सदर अभियान हे सात वर्षाचे असून सन २०११–२०१२ हे वर्ष या अभियानाचे अंतिम वर्ष आहे.

- पायाभूत सुविधा विकास या क्षेत्राअंतर्गत एकूण रक्कम रूपये १९१८.८६ कोटीचे प्रस्ताव मंजूर असून शासनाचे रक्कम रूपये १०६१.०० कोटी प्राप्त झालेले आहेत.

- शहरी गरीब निर्मूलनाकरीता एकूण रक्कम रूपये ५२२.४० काटीचे प्रस्ताव मंजूर असून शासनाकडून रक्कम रूपये ९०.०० कोटी प्राप्त झाले आहेत व रक्कम रूपये १२७.०० कोटी खर्च झालेला आहे. JNNURM प्रकल्प राबविणेच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेस करावयाच्या अनिवार्य व वैकल्पिक सुधारणा पूर्ण झालेल्या आहेत. सदर योजनेअंतर्गत आर्थिक बाबीबाबत UIG या क्षेत्रासाठी मंजूर निधी माहे मार्च, २०१२ अखेर प्राप्त करून घेण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

- **पायाभूत सुविधांचा विकास करणे–**

**रस्ते–**

पुणे शहरातील ११८ कि. मी. प्रमुख रस्ते रुंदीकरणाची कामे करण्यात येत आहेत. तसेच यामध्ये १८ प्रमुख मार्गावरील बीआरटी प्रस्तावित असून हडपसर ते कात्रज बीआरटी पायलट या प्रकल्पाचे कामकाज पूर्ण झालेले आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत रस्त्यांसाठी एकूण रक्कम रुपये १०६८ कोटीचे प्रकल्प मंजूर झालेले आहेत. वरील सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर शहरातील वाहतूकीचे प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

**सब–वे–**

एकूण रक्कम रुपये १३.८७ कोटीचे चार सब–वे मंजूर झालेले होते. सर्व सब–वे ३०% पूर्ण करण्यात आलेले असून उर्वरित कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

**मलनि:सारण प्रकल्प–**

एकूण २६२ एमएलडीचे ५ मलनि:सारण प्रकल्प व २ रायझिंग मेनचा व २ पंपिंग स्टेशन यांचा समावेश आहे. यामध्ये ४ प्रकल्पांचे कामकाज पूर्ण होऊन २२२ एमएलडीचे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून खराडी प्रकल्प माहे मार्च, २०१२ अखेर कार्यान्वित होणार आहे. सदरचा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर २६२ एमएलडी मैलापाण्यांवर शुद्धीकरण प्रक्रिया सुरु होणार आहे.

**नदी सुधारणा प्रकल्प–**

याअंतर्गत एकूण रक्कम रुपये १९७.७४ कोटीचे दोन प्रकल्प मान्य झाले असून या प्रकल्पांमध्ये चॅनेलायझेनशन, मध्यवर्ती चॅनेलची निर्मिती, नदी–नाला विकसन, कात्रज व पाषाण तलावाचे सुशोभिकरण व बायोरेमिडिएशन इत्यादी कामांचा समावेश आहे. संरक्षण भिंत बांधल्याने मोठ्या प्रमाणावर पूर पातळी कमी होऊन नदी काठावरील वसाहतीचे पुरापासून संरक्षण होण्यास मदत झाली आहे. उपरोक्त कामांमुळे नदीची वहनक्षमता वाढविणे तसेच नदीकाठ संरक्षित करणे त्याप्रमाणे प्रादुर्भावित झालेले पाणी मुख्य प्रवाहात मिसळण्यास प्रतिबंध करणे या बाबी साध्य होणार आहेत. तसेच नदी प्रदूषण मुक्त होऊन पर्यावरणास अनुकूल परिस्थिती निर्माण होणार आहे. त्याचप्रमाणे जैववैविध्यास पूरक वातावरण तयार होऊन पर्यटनासदेखील चालना मिळू शकणार आहे. नदी सुधारणा योजनेअंतर्गत वारजे ते

म्हात्रे पूल चॅनेलायझेशनचे ९०% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम सन २०१२ या वर्षात पूर्ण होणार आहे. त्यामुळे नदीपात्राचे ठिकठिकाणी वसलेली पाण्याची डबकी व त्यामुळे होणारा डासांचा प्रादुर्भाव कमी होणार आहे.

**तलाव सुधारणा –**
या कामामुळे गाळ काढणे, वृक्षारोपण, सोशल इन्फ्रास्ट्रक्चर, रोपवाटिका, कॅटल टँक, उर्वरित संरक्षण भिंती बांधणे, बेटास संरक्षण करणेकरिता गॅबिअन पद्धतीने भिंत बांधणे, जॉगिंग ट्रॅक बांधणे इत्यादीमुळे पर्यावरणपोषक वातावरण निर्मिती, पर्यटनाला चालना व शहराच्या सौंदर्यीकरणामध्ये भर पडणार आहे.

**पावसाळी गटार योजना (स्ट्रॉर्म वॉटर ड्रेनेज) :–**
पुणे शहरातील पावसाठी पाणी वाहून नेण्यासाठी स्टॉर्म वॉटर प्रकल्पाचे नियोजन करण्याचे अनुषंगाने शहराचे सर्वेक्षण करून वॉटर शेडनुसार २३ भाग (२३ बेसीन्स) करण्यात आले असून, त्यानुसार प्रकल्पाचे नियोजन केले आहे.

पहिल्या टप्प्यात वरीलपैकी चार बेसीनचे स्टॉर्म वॉटर प्रकल्पाचे काम जेएनएनयुआरएम चे सहायाने सुरू करण्यात आले. मागील आर्थिक वर्षात सुमारे ६५% काम पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, वरील प्रकल्पास नाल्यांचे अंतर्गत कामासाठी मे. उच्च न्यायालयाने माहे मे, २०११ मध्ये स्थगिती आदेश दिल्याने सदरचे काम पूर्ण होऊ शकले नाही. सदरची स्थगिती उठविण्याचे प्रयत्न करण्यात येत असून स्थगिती आदेश उठविण्यात आल्यानंतर या आर्थिक वर्षात सदर प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे.

**शहरी गरिबांसाठी मुलभूत सुविधा कार्यक्रम (BSUP):–**
या योजनेअंतर्गत रक्कम रूपये ३८१.६१ कोटीचे प्रकल्प मंजूर आहेत. सदर प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाकडून रक्कम रूपये ५५.६८ कोटी व राज्य शासनाकडून रक्कम रूपये १८.१९ कोटी प्राप्त झाले असून रक्कम रूपये ९४.४५ कोटी इतका खर्च झालेला आहे. **In-situ Rehabilitation** या योजनेखाली रक्कम रूपये १४०.८० कोटीचा प्रकल्प मंजूर झालेला आहे. केंद्र शासनाचे रक्कम रूपये १६.०२ कोटी प्राप्त झालेले असून रक्कम रूपये ११.४२ कोटी इतका खर्च झालेला आहे.

## (१५) <u>भवन रचना</u>

- सन २०११–१२ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीमधून प्रामुख्याने स्वर्गीय राजीव गांधी ई–लर्निंग स्कूल येथील शाळा इमारत, स्वर्गीय अंनतराव पवार इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा तळमजला, तसेच येरवडा, विमानतळ रस्ता, नरवीर तानाजीवाडी, बालेवाडी व पंडित दिनदयाळ येथील शाळा इमारती बांधण्याची तसेच काही ठिकाणी आवश्यकतेनुसार वर्गखोल्यामध्ये वाढ करण्याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

- पाषाण येथे फायरब्रिगेड, विविध मनपा शाळांमध्ये अग्निशामक यंत्रणा, बालेवाडी येथे नवीन स्मशानभूमी, कमला नेहरू रूग्णालयाचे अंतर्गत सुशोभिकरण, वारजे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, इत्यादी कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

- घोरपडे पेठ, स. नं. १०७/१०८ व स. नं. ११९, वारजे, स. नं. ९३, कर्वेनगर याठिकाणी जलतरण तलाव बांधण्याची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

- बिबवेवाडी येथे विस्तापितांसाठी ८३ गाळे बांधण्यात आले असून राजाराम भिकू पठारे विद्यालय येथे स्पोर्टस् गॅलरीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

## (ब) दृष्टीक्षेपात सन २०१२–१३ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज–

**सन २०१२–१३ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.**

**(आकडे रूपये कोटीत)**

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | ६९३.०० |
| आयातकर | १३५७.५० | प्राथमिक शिक्षण | २४६.९८ |
| मिळकतकर | ६११.८६ | वीज खर्च व दुरूस्ती | १३०.१४ |
| विकास शुल्क | ५४६.०० | पाणी खर्च | ३३.४० |
| पाणीपट्टी | ६८.५५ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ८७.२३ |
| शासकीय अनुदान | ११५.६० | औषधे, पेट्रोल/डिझेल | ५२.१० |
| JNNURM अनुदान | २४६.२९ | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | ३१४.९६ |
| इतर जमा | २४४.८४ | वॉर्डस्तरीय | ३२.४० |
| कर्ज | १००.०० | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ९८.०५ |
| | | भांडवली व विकासाची कामे | ११२९.५७ |
| | | जेएनएनयुआरएम | ४७२.८१ |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकूण** | **३२९०.६६** | **एकूण** | **३२९०.६६** |

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) आयातकर –

- सन २०१२–१३ या आर्थिक वर्षासाठी जकातकराचे जमा उत्पन्नाचे उद्दिष्ट १४२५ कोटी इतके सुचविण्यात आलेले असून जकातकराच्या उदिष्टपूर्तीकरीता आयातकर कार्यालयामार्फत विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत.

- **पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून बाहेर जाऊन हद्दीत परत येणाऱ्या लेखनिक शुल्कात रक्कम रुपये १०० ऐवजी रुपये ५०० इतकी वाढ करणे :–** प्रस्तुत प्रकरणी मे. शासनाने दिलेल्या आदेशानुसार सदर बाबीस प्रथम पूर्वप्रसिध्दी द्यावी व तदनंतर प्रस्ताव शासनास पाठवावा, असे निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार सदर बाबीचे दैनिक वर्तमानपत्रात तसेच राजपत्रात जाहीर प्रकटन देण्यात आलेले असून, विषयांकित प्रकरणी नागरिकांच्या कोणत्याही हरकती व सूचना प्राप्त न झाल्याने सदर प्रस्ताव पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता शासनास पाठविणेची कार्यवाही सुरू आहे. केवळ सार्वजनिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता असल्याने प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही झालेली नाही. शासन मान्यता मिळाल्याच्या दिनांकापासून सदर प्रकरणी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून बाहेर जाऊन हद्दीत परत येणाऱ्या लेखनिक शुल्कात रक्कम रूपये १००/– ऐवजी रक्कम रूपये ५००/– इतकी वाढ करणेबाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ३९२, दिनांक २४/०७/२००९ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार आयातकर कार्यालयास वार्षिक रक्कम रुपये ३.०० ते ३.५० कोटी इतके उत्पन्न अतिरिक्त मिळणार आहे.

- आयातकर कार्यालयाकडील जकातकराबाबत जकातकर नियमावली, २००८ मधील नियमामध्ये सुधारणा व वाढ करणेसाठी आणि अनुसूचि-१, नियम-४ मधील जकातपात्र माल /वस्तू/ जिन्नस यांची कमाल दराची मर्यादा वाढवणेबाबतचा प्रस्ताव आयातकर कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेला आहे. त्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेने ठराव क्रमांक ४००, दिनाक २४/०८/२०११ नुसार मान्यता मिळालेली असून सदर प्रस्ताव मे. शासनाचे मान्यतेनंतर लागू करण्यात येणार आहे व त्याामुळे वार्षिक उत्पन्नात निश्चितच वाढ होणार आहे.

- सन २०११-१२ या आर्थिक वर्षांसाठी जकातकराचे अनुसुचि १ (नियम ४) मधील जकातकर माफीस पात्र असलेल्या जीवनावश्यक वस्तूसह कमाल दराने जकातकराची उगवणी करणे व नियमावलीमध्ये दुरूस्ती करणेबाबतचा प्रस्ताव आयातकर कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेला आहे. त्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतर अंदाजे वार्षिक १०० कोटी इतके जकात उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे.

- ६ मुख्य जकात नाकी वगळता आयातकर कार्यालयाकडील उर्वरित सर्व संगणकीकृत जकात नाक्यांवर **CCTV** कॅमेरे बसविणेबाबतची कार्यवाही आयातकर कार्यालयामार्फत सुरू आहे.

- **इडिसी मशिन (स्वॅप मशिन)**:- नाक्यावर रोखीने होणारे व्यवहार कमी होणेसाठी **HDFC** बँकेबरोबर करार करून त्यांचेमार्फत महत्वाच्या व मोठया उत्पन्नाच्या नाक्यांवर इडिसी मशिन्स, आयातदारांच्या सोयीसाठी बसविण्यात आलेल्या असून आयातदारांनी **HDFC** बँकेमार्फत सदर ऑक्ट्रॉय कार्डची सुविधा घेतलेली आहे. त्यामुळे नाक्यावरील रोखीचे व्यवहार कमी होण्यास मदत झाली असून, आयातदारांना सुरक्षिततेच्या दृष्टिने मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जवळ बाळगण्याची आवश्यकता संपुष्टात आली आहे. सध्या औंध, फुगेवाडी, खराडी, शेवाळवाडी, बालेवाडी, शिंदेवाडी, विश्रांतवाडी (कळस), भेकराई व विमानतळ या जकात नाक्यांवर ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत रुपये ४९ कोटी ८३ लाख एवढी रक्कम आक्ट्रॉय कार्डच्या माध्यमातून वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरीत जकात नाक्यांवर सदर सुविधा पुरविण्याचा प्रस्ताव आहे.

- **ई. सी. एस. (ECS) पध्दती** :-आयातकर कार्यालयाच्या खातेदार विभागाकडील सेवकांना जकातीपोटी जमा होणारे आयातदारांचे धनादेश **HDFC** बँकेत विहीत मुदतीत प्रत्यक्ष जाऊन जमा करावे लागतात. या सर्व प्रक्रियेमुळे वेळेचा अपव्यय होत आहे. ई. सी. एस. (ECS) सुविधेमुळे वेळेची बचत होऊन प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण होण्याच्या दृष्टिने आयातकर कार्यालयासाठी **HDFC** बँकेमार्फत ई. सी. एस**. (ECS)** पध्दती सुरू करणेचा प्रस्ताव आहे.

- **रहदारी शुल्क भरणाऱ्या वाहनांना पकडणेसाठी सुधारित तंत्रज्ञानाचा वापर**:-**(Escort Vehicle Tracking System) (Radio Frequency Identification Device-RFID)** रहदारी पास घेणाऱ्या वाहनांनी ठराविक काळातच हद्दीबाहेर जाणे आवश्यक असते. तथापि, सध्याच्या परिस्थितीत वेळेत वाहने हद्दीबाहेर गेली किंवा नाही यावर नियंत्रण ठेवता येत नाही. त्यामुळे जी. आय. एस. / जी. पी. आर. एस / रेडीओ फ्रिकव्हेन्सी आयडेंटीफिकेशन डिव्हाईस पध्दतीचा अवलंब करून अशा प्रकारच्या वाहनांना पकडण्याची कार्यवाही सुरू करणेचा प्रस्ताव आहे.

- शेवाळवाडी जकात नाक्यांवर वाहनांची गर्दी कमी करणे व सोलापूर रस्त्यावरील नाक्यासमोरील अपघात कमी होणेसाठी लोणी टर्मिनल येथून हिंदुस्तान व भारत पेट्रोलियम या ऑईल कंपन्यांच्या वाहनांची जकात कंपन्यांमध्येच वसूल करणेसाठी या ठिकाणी नव्याने जकात नाकी निर्माण करून जकात उगवणी करण्याचा प्रस्ताव आहे.

- सोने व चांदी या मालाची कमाल दराने जकात उगवणी करण्यात येत असल्याने या मालापासून मिळणारे जकात उत्पन्न वार्षिक अंदाजे रक्कम रुपये २० कोटी इतके अपेक्षित आहे.

- बाणेर ते पिंपळेनिलख या गावांना नव्याने जोडणारा रस्ता सुरू झाला असल्याने त्या मार्गावर आवक मालाच्या वाहनांवर जकात उगवणी करण्यासाठी नव्याने जकात नाका बसविण्यात येणार आहे.

- रात्रीच्या वेळी पुणे म. न. पा. हद्दीत आयात होणाऱ्या मालाची तपासणी करणेकामी सध्या असलेल्या गस्तीपथकात वाढ करण्यात येणार आहे.

- शेवाळवाडी व भेकराई जकात नाका हा महामार्गावर असल्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची सतत वर्दळ होत असते. ज्यामुळे जकात नाक्याच्या आवारातील जकात भरणेकामी आलेल्या वाहनांना व आयातदारांना त्रास होतो. त्यामुळे अशा नाक्यांच्या बाजूने सिमाभिंत बांधण्याचा प्रस्ताव आहे.

- खराडी जकात नाक्यासाठी असलेली जागा ही सध्या भाडेतत्वावर असल्याने सदर नाक्याकरीता पुणे मनपाच्या मालकीची जागा असणे आवश्यक आहे. त्यामुळे भाडेतत्वावर असलेल्या व पुणे मनपाचा मालकी हक्क नसलेल्या जागेवरील उदा. खराडी, उंड्री, स्वारगेट नाक्यांकरीता जागा संपादन करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

- खराडी जकात नाक्यांवर ६० टनी वजनकाटा बसविणेची कार्यवाही आयातकर कार्यालयामार्फत सुरू आहे. सन २०१२–१३ या आर्थिक वर्षात पुरेशी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध होताच सदरचे काम कार्यान्वित करण्यात येणार आहे.

## (२) <u>मिळकतकर</u>

- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ६३ व ६६ तसेच तद्नुषंगीक प्रयोजनांसाठी कलम १२७ व १२९ नुसार मिळकतकरांतर्गत विविध कर, यामध्ये सर्वसाधारण कर, पाणी पट्टी, सफाई कर, अग्निशामक कर, वृक्षसंवर्धन कर, जललाभ कर, जलनिस्सा:रण लाभ कर, पथ कर, विशेष सफाई कर, इत्यादी वसूल करण्यात येतात. याशिवाय शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी जागेवरील कर हे मिळकतधारकांकडून वसूल करण्यात येऊन ते राज्य शासनाकडे जमा करण्यात येतात.

- सन २०१२–१३ या आर्थिक वर्षासाठी मिळकतकरांच्या दरामध्ये कोणतीही दरवाढ न सूचविता सन २०११–१२ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या मिळकतकराचेच दर प्रस्तावित करण्यात आले असून सुमारे रक्कम रूपये ६२० कोटी इतकी अपेक्षित जमा सुचविण्यात आली आहे.

- सन २०११–१२ या वर्षातील कार्यपध्दतीच्या धर्तीवर सन २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये देखील सुरूवातीपासूनच मिळकतकराची वसूली करण्यावर, तसेच नवीन मिळकतींची कर आकारणी करण्यावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात येणार आहे.

- माहे एप्रिल व मे मध्ये मिळकतकराची संपूर्ण रक्कम (थकबाकीसह) आगाऊ भरणाऱ्या मिळकतधारकास सर्वसाधारण करामध्ये देण्यात येणारी ५% व १०% सवलत योजना सन २०१२–१३ मध्ये देखील प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सन २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये देखील सुरूवातीपासूनच मिळकतकराची वसूली करण्यावर तसेच नवीन मिळकतींची कर आकारणी करण्यावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात येणार आहे.

- त्याचप्रमाणे कलम १४० ब अनुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजना या अनुषंगाने पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, गांडूळ खत प्रकल्प, सौर उर्जेचा वापर, इत्यादी पर्यावरणानुकूल योजनांना चालना देण्यासाठी अशा योजना राबविण्यात येणाऱ्या निवासी मिळकतींना देण्यात येणारी सवलत सन २०१२–१३ या आर्थिक वर्षाकरिताही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## (३) बांधकाम परवानगी व विकास शुल्क

सन २०११–१२ मध्ये बांधकाम विकास विभागामध्ये सुरु असलेल्या विविध कार्यपध्दतीचा सखोल अभ्यास करुन, बांधकाम विकास विभाग व पुणे मनपामधील इतर विभाग यांच्यातील समन्वय विचारात घेऊन बांधकाम प्रस्तावांना आदा करावयाच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

सन २०१२–१३ या वर्षामध्ये सुमारे ४००० संभाव्य बांधकाम प्रस्ताव मान्यतेस दाखल होतील असा अंदाज आहे. तसेच सदर बांधकाम प्रस्तावांपोटी सन २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये सुमारे ५४६.०० कोटी इतका महसूल महापालिकेकडे जमा होईल असा अंदाज आहे.

## (४) पाणी पट्टी

पाणीपट्टीपोटी असलेली थकबाकी वसूल करणेकामी स्वतंत्र सल्लागार नियुक्त करण्यात येत असून मोठ्या प्रमाणात तफावतीची बिले दुरुस्त करुन पाणीपट्टीपोटी असलेली थकबाकी समायोजित करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

सन २०११–१२ या आर्थिक वर्षामध्ये रुपये २ कोटी रकमेचे समायोजन करणे शक्य झाले आहे. या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात थकबाकी वसूल करण्याचा मानस असून त्यासाठी थकबाकीदार ग्राहकांना नोटीसा देवून कारवाई करणे इत्यादी बाबी अंमलात आणण्यात येणार आहेत.

## (५) आकाशचिन्ह व परवाना शुल्क

- सन २०१२–१३ मध्ये आकाश चिन्ह धोरणाच्या अंमलबजावणीव्दारे महानगरपालिकेस सुमारे रक्कम रुपये ४१.०० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

## विकास कामे व योजना :-

### १) पाणी पुरवठा (तरतूद रक्कम रुपये ४१२.४० कोटी–महसूली २२७.३५ कोटी व भांडवली १८५.०५ कोटी)

- पाणी पुरवठा करणेसाठी होणारा खर्च पाणीपट्टीमधून वसूल करणेकामी वापरानुसार दर सुचविण्यात आलेले आहेत. याबाबतचे विषयपत्र मा. स्थायी समितीकडे सादर करण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावाप्रमाणे पाणी पुरवठा विभाग स्वावलंबी करणे शक्य आहे. दरवर्षी अंदाजे रक्कम रुपये ६० ते ६५ कोटी पाणीपट्टीपोटी जमा होतात. प्रस्तावित पाणीपट्टीनुसार जरी जमा बाजूस मोठा फरक पडत नसला तरी पाण्याचा अपव्यय टाळणे शक्य होणार आहे व सदरची बाब अत्यंत महत्वाची आहे.

- शहरात होत असलेल्या साठवण टाक्यांमधून होणारा पाणी पुरवठा मोजण्यासाठी यापूर्वी मीटर बसविण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. या आर्थिक वर्षामध्ये शहरातील साठवण टाक्यांमध्ये आधुनिक जलमापक बसवून **SCADA** करुन नोंद ठेवण्याचा मानस आहे.

- शहरात असलेल्या घरगुती नळजोडावर १००% मीटर बसविणेसाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदरचा प्रस्ताव जेएनएनयुआरएमकडे आर्थिक मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. आधुनिक घरगुती मीटर बसवून मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी वसूल करणे या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट आहे. आर्थिक वर्षामध्ये सल्लागारामार्फत सदर योजनेचा अहवाल अपेक्षित आहे. सदरची योजना जेएनएनयुआरएम व जागतिक बँक, **JICA, ADB** इ. वित्तीय संस्थाकडे सादर करण्यात येणार असून योजनेस मान्यता मिळाल्यानंतर येत्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये योजना राबविण्यात येणार आहेत.

- **सन २०१२–१३ च्या अंदाजपत्रकानुसार पाणी पुरवठा विभागासाठी सुचविण्यात आलेल्या महत्वाकांक्षी योजना.**

१) समान पाणी वाटप योजना.
२) खडकवासला धरण ते लष्कर जलकेंद्रापर्यंत पर्वती जलकेंद्रामार्फत २५०० मि.मी. व्यासाची दाब नलीका टाकणे.
३) पर्वती येथे ५०० एमएलडी क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण प्रकल्प बांधणे.
४) वडगाव जलशुध्दीकरण केंद्रा शेजारी २५० एमएलडी क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र उभारणे.
५) शहरामध्ये वॉटर ऑडिट करण्यासाठी १००% मापके बसवणे कामीचे अहवाल गछछ्णठच योजने अंतर्गत शासनाकडे सादर करणे.
६) वारजे योजना (टप्पा क्र. २ व ३) पुर्ण करणे.
७) नविन हद्दीतील वितरण व्यवस्था विकसित करणे.
८) वापरा प्रमाणे ग्राहकाकडून पाणीपट्टी वसूल करणे.
९) कामी टेलीस्कोपीक दर अंमलात आणणे
१०) शहरातील साठवण टाक्यांमधून विभागनिहाय होणाऱ्या पाणी पुरवठयाचे मोजमाप करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योजना राबवणे.

- **पुणे शहर जेएनएनयुआरएम सिटी असल्याने केंद्र सरकारतर्फे खालील अनिवार्य व वैकल्पिक सुधारणा सुचविण्यात आलेल्या आहेत.**
  १) यामध्ये पाणी पुरवठयाविषयी शहरामध्ये १००% मीटर बसविणे,
  २) टेलिस्कोपिक दराने बिलिंग करणे,
  ३) पाणी पुरवठा ऑडिट करणे,
  ४) पाणी पुरवठयावर होणारा खर्च वसूल करणे इ. बाबींकरिता प्रस्ताव सादर करण्यात आलेले असून त्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

- **पर्यावरण अहवालाचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे कामे सूचित केलेली आहेत.**
  १) वितरण व्यवस्थेचे पूर्णपणे परिक्षण करून मानकांनुसार समान पाणी वाटप योजना राबविणे व १००% बंद नलिकेतून पाणी उपलब्ध करून घेणे.
  २) पाणीपुरवठयाकरिता १००% मीटर पध्दतीचा अवलंब करणे.
  ३) नादुरूस्त जलवाहिन्या बदलण्याच्या व नळ जोडण्यांमधील पाणी गळती थांबविण्याच्या दृष्टिने उपाययोजना करणे.
  ४) पाण्याच्या वापरावर नियंत्रण राखण्यासाठी पाणी वापराचा वारंवार हिशोब (**Water Audits**) ठेवणे.

- **सेवा दर्जा मानंकानुसार निर्धारित सेवा दर्जात्मक उद्दिष्ट**

| अ. क्र. | सर्व्हिस लेव्हल बेंचमार्कींग | अपेक्षित कार्यक्षमता | मार्च २०१२ पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | मार्च २०१३ पर्यंत प्रगती करण्यासाठीचे उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|
| १ | नळजोडाव्दारे पाणीपुरवठा होणारी कुटूंब संख्या (Coverage of water supply connections) | १००% | ९४.३१ % | ९५ % |
| २ | दरडोई हाणारा पाणीपुरवठा (Per liter capita supply ofwater) | १३५ लि. प्र. मा. | १९४ लि. प्र. मा. | १९० लि. प्र. मा. |
| ३ | पाण्याचे मिटर बसविलेल्या नळ जोडणींचे प्रमाण (Extent of metering of water connections) | १००% | ३०.६० % | ३५% |
| ४ | महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण (Extent of non revenue water NRW) | २०% | ३०.००% | २५% |
| ५ | पाणीपुरवठा करण्यातील सातत्य (Continuty of watersupply) | २४७ | ४ ते ६ तास | ६ ते ८ तास |
| ६ | पाण्याचा दर्जा (Quality of water supplied) | १००% | ९९.३९ % | १००% |
| ७ | ग्राहकांच्या तक्रारी निवारणाचे प्रमाण (Efficiency in redressal of customer complaints) | ८०% | ९९% | ९९% |
| ८ | पाणीपुरवठयाशी सेवेवरील खर्चाच्या रक्कमेची वसुली (Cost recovery in water supply services) | १००% | ८९.२ % | ९०% |
| ९ | पाणीपुरवठयाशी संबंधित आकारांची वसुली (Efficiency in collection of water supply related charges) | ९०% | ८६% | ९२% |

## २) मलनि:सारण (तरतूद रक्कम रुपये–१३६.८१ कोटी)

- सन २००९–१० या आर्थिक वर्षापर्यंत शहरात एकूण निर्माण होणा–या मैलापाण्यापैकी ३८२ एमएलडी मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यात येत होती. सन २०१०–११ या आर्थिक वर्षामध्ये डॉ. नायडू हॉस्पिटल (नवीन) येथील ११५ एम.एल.डी. क्षमतेचे व बाणेर येथील ३० एम.एल.डी. क्षमतेचे मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्प यशस्वीपणे कार्यांन्वित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सध्या पुणे शहरामध्ये निर्माण होणाऱ्या एकूण मैलापाण्यापैकी ५२७ एम.एल.डी. (७०.८०%) मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. येत्या काही दिवसांत खराडी येथे ४० एमएलडी क्षमतेचे मैलापाणी शुध्दीकरण केंद्र कार्यान्वित करण्यात येणार असून त्यामुळे पुणे शहरामधील मैलापाणी प्रकल्पांची एकूण प्रकल्प क्षमता ५६७ एमएलडी (७६.२०%) होणर आहे.

- पुणे शहरात होत असलेल्या पाणी पुरवठयाच्या अनुषंगाने दररोज अंदाजे ७५० एमएलडी मैलापाणी निर्माण होते. पुणे शहरात एकूण दहा मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे कार्यांन्वित असून त्यांची एकूण क्षमता ५६७ एमएलडी एवढी आहे. त्यामुळे शहरात निर्माण होणाऱ्या मैलापाणी पैकी अंदाजे २५% मैलापाणी विनाप्रक्रिया नदीत सोडण्यात येते. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पुणे शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण मैलापाणी प्रक्रिया करून नदीत सोडणे कामी रक्कम रूपये ७१५ कोटीची योजना तयार करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून ७०% व राज्य शासनाकडून २०% अनुदान स्वरूपात मिळणे अपेक्षित आहे.

- पुणे मनपा व पाटबंधारे विभागांमध्ये झालेल्या करारांनूसार पुणे मनपास ६½ टीएमसी एवढया मैलापाण्यावर प्रक्रिया करून सिंचनासाठी उपलब्ध करून दयावयाची आहे, त्यासाठी खराडी येथे बंधारा बांधणे, जॅकवेल बांधणे व खराडी ते साडेसतरानळीपर्यंत दाब नलिका टाकण्याचे काम या वर्षी हाती घेण्यात येत आहे.

- सेवा दर्जा मानंकानुसार निर्धारित सेवा दर्जात्मक उद्दिष्ट

| अ. क्र. | सर्व्हिस लेव्हल बेंचमार्कींग | अपेक्षित कार्यक्षमता | मार्च २०१२ पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | मार्च २०१३ पर्यंत प्रगती करण्यासाठीचे उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छतागृह उपलब्ध्तेचे प्रमाण (Coverage of Toilets) | १००% | ९७.५७% | ९८% |
| २ | मलनिःसारण सेवेच्या उपलब्धतेचे प्रमाण (Coverage of Sewage Network) | १००% | ९७.५७% | ९९% |
| ३ | मलनिःसारण व्यवस्थेव्दारे जमा होणाऱ्या मलनिःसारणाचे प्रमाण (Collection Efficiency of the Sewage Network) | १००% | ६९.६३% | ८०% |
| ४ | मलनिःसारण प्रक्रीया प्रकल्पाच्या कार्यक्षम–तेचे प्रमाण (Sewage Treatment Capacity) | १००% | ६६.८०% | ८०% |
| ५ | मलनिःसारण प्रक्रीयेची गुणवत्ता (Quality of Sewage Treatment) | १००% | १००% | १००% |
| ६ | मलनिःसारण पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरणाची टक्केवारी (Extent of reuse and recycling of Sewage) | २०% | ५.३८% | ८% |
| ७ | ग्राहकांच्या तक्रारी निवारणाचे प्रमाण (Efficiency redressal of Customer Complaints) | ८०% | ९९.९९% | ९९.९९% |
| ८ | मलनिःसारण व्यवस्थापनास येणाऱ्या खर्चाची वसूली (Recovery in Sewage Management) | १००% | ७६.०६% | ८०% |
| ९ | मलनिःसारण आकार वसूलीची कार्यक्षमता (Efficiency in Collection of Sewage Charges) | ९०% | ६८.८१% | ८०% |

## ३) घन कचरा व्यवस्थापन–(तरतूद रक्कम रुपये ७०.९४ कोटी)

- कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेसाठी व कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केल्यानंतर उर्वरित १५ ते २०% इनर्ट मटेरियलची विल्हेवाट लावण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपण भूमी तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. शासनाकडून जागा ताब्यात आल्यानंतर भविष्यातील लोकसंख्या व शहरवाढ विचारात घेऊन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात घेऊन सुविधाविषयक कामे करण्यात येणार आहेत.

- नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी प्रारूप विकास आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे. यात घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी बाणेर, वडगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक, कात्रज, कोंढवा बुद्रुक, हडपसर या ठिकाणी जागा आरक्षित आहेत. शासनाकडून विकास आराखडयास मान्यता मिळाल्यानंतर शहरातील आरक्षित Garbage Processing Plant साठी जागा ताब्यात घेऊन या ठिकाणी १०० मे. ते २०० मे. टन क्षमतेचे बंदिस्त प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

- १०० मे. टन ओला कचरा व मैलापाणी शुध्दीकरण केंद्रातील स्लजचा वापर करून गॅसनिर्मितीचा प्रकल्प नायडू मैलापाणी शुध्दीकरण केंद्राच्या जागेत करण्याची कार्यवाही मलनिःसारण विभागाकडून सुरू आहे. सदर प्रकल्प बी. ओ. टी. तत्वावर उभारण्याचे नियोजन असून या प्रकल्पामधून वीज निर्मिती होऊ शकेल.

- शहराच्या हद्दीतच कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणी प्रकल्प उभारल्यास कचरा वाहतूकीच्या खर्चात बचत होऊन वाहतुकीमुळे होणारे प्रदूषणही बंद होणार आहे. त्यादृष्टीने कचऱ्यावर प्रक्रिया करणेच्या दृष्टीने शहरातच जागेची उपलब्धता, कचरा निर्माण होण्याचे परिमाण लक्षात घेऊन नव्याने १५ ठिकाणी ५ मे. टन प्रतिदिन क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प उभारून त्यापासून विद्युत निर्मिती करण्याचे काम यावर्षी हाती घेण्यात आलेले आहे.

- ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर असलेल्या बंदीची कार्यवाही क्षेत्रीय कार्यालयांकडील उपद्रव शोधक पथक व आरोग्य निरिक्षकांमार्फत यापुढेही प्रभावीपणे चालू ठेवण्यात येणार आहे.

- पुणे मनपा हद्दीत प्रतिदिन सुमारे १००० किलो थर्माकोलची विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. सदर थर्मोकोलचा वापर झाल्यानंतर तो कचऱ्यामध्ये तर काही ठिकाणी नाला, ड्रेनेज लाईनमध्ये टाकण्यात येतो. थर्माकोलचा कचरा हा अविघटनशील कचरा असल्याने तो वर्षानुवर्षे तसाच पडून राहतो. यासाठी थर्माकोल रिसायक्लींग करण्याच्या दृष्टीने थर्माकोलचे तुकडे करून त्याचे मशिनद्वारे मेल्टिंग करून त्यापासून विविध उपयोगी वस्तूंची निर्मिती करणे शक्य आहे. त्याकरिता थर्माकोल प्रोसेस करणारा प्लँट उभारणी करण्याचे नियोजन प्रस्तावित आहे.

- उरूळी देवाची/फुरसुंगी येथील जागेवर यापूर्वी टाकण्यात आलेला कचरा शास्त्रोक्त पध्दतीने बंदिस्त (कॅपिंग) करणे बंधनकारक असल्याने याकामी नेमण्यात आलेले तज्ञ सल्लागार मे. आय. एल. एफ. एस. यांनी सादर केलेल्या डी. पी. आर. प्रमाणे काम करण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुढील दोन वर्षात सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- मंडईमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता शहरामध्ये उपलब्ध होणाऱ्या सोयीच्या जागांवर ५ मे. टन क्षमतेचे मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प नव्याने उभारण्याचे प्रयोजन आहे.

- कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या ॲमिनेटी स्पेस म्हणून आरक्षित असणाऱ्या जागांवर कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे काही प्रमाणात गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

- कचरा प्रक्रिया प्रकल्पामधून वीजनिर्मिती करणे व त्याचा वापर स्ट्रीट लाईटसाठी (रस्त्यांवरील दिवे) करण्याचे प्रयोजन आहे. पुणे शहरातील रस्त्यांवर असलेल्या दिव्यांकरिता वीजनिर्मिती करणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट लावणेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे तसेच प्रसिध्दी माध्यमातून यासाठी प्रभावीपणे मोहिम राबविणेकरीता तरतूद करण्यात आलेली आहे.

- पुणे शहरातील कचऱ्याबाबत कार्यवाही करणेसाठी स्वतंत्रपणे नव्याने दोन पथकांची स्थापना करणे व सदर पथकांमार्फत हद्दीतील कचरा उठाव व त्याचे नियोजन याची तपासणी करणे, कचरा वाहतूक गाड्या तपासणे, आवश्यकता वाटल्यास स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमून याबाबत कामकाज करणे तसेच अंमलबजावणी न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

- महापालिकेने दिलेल्या आश्वासनानुसार व जिल्हाधिकारी यांनी सुचविल्यानुसार उरुळी देवाची व फुरसुंगी या दोन गावांतील रस्ते, स्मशानभूमी, आरोग्य क्रेंदे, पाणीपुरवठा व ड्रेनेज विषयक उर्वरित विकास कामे पूर्ण करण्यासाठी तरतूद सुचविण्यात आलेली आहे.

## ४) <u>आरोग्य विभाग – (तरतूद रक्कम रुपये १२५.१८ कोटी)</u>

- पुणे मनपा व खाजगी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने,

  १. लायन्स क्लब दवाखाना, सहकारनगर येथे ५ मजली इमारत बांधून सुसज्ज डायलिसिस सेंटर सुरू करणे.
  २. खराडी येथील इमारतीत प्रसूतिगृह सुरू करणे,
  ३. कै. नामदेवराव शिवरकर, वानवडी व कै. मिनाताई ठाकरे, कोंढवा येथे पॉलिक्लिनिक सुरू करणे,
  ४. हर्मिस कॉम्प्लेक्स, विमाननगर, येथे स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करणे,
  ५. वडगाव बुद्रुक येथे १.५ एकर जागेवर सर्वसाधारण रूग्णालय सुरू करणे,
  ६. बिबवेवाडी येथे बाह्यरुग्ण विभाग व डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र येथे प्रसूतीगृह सुरु करण्यात येणार आहे.

- **कुटुंब कल्याण कार्यक्रम**
  लॅप्रोस्कोपी नसबंदी शस्त्रक्रिया व पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात येतील.

- **माता व बाल आरोग्य**
  १. पुणे महानगरपालिकेतील वैद्यकिय अधिकारी यांना बेसिक इर्मजन्सी ऑबस्टेट्रीक केअरचे प्रशिक्षण देण्यात येईल.
  २. नवजात शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत उर्वरित वैद्यकीय अधिकारी व नर्सेस यांना प्रशिक्षण देण्यात येईल.
  ३. वर्षाला २५० पेक्षा जास्त बाळंतपण होत असलेल्या खाजगी रूग्णालयांमध्ये माता मृत्यू अन्वेषण समिती स्थापन होईल, यादृष्टिने नियोजन प्रस्तावित आहे.

## ५) नगर नियोजन – (तरतूद रक्कम रुपये ३१.३१ कोटी)

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पुणे शहर व सन १९९७ साली समाविष्ट झालेल्या २३ गावांचे मिळून २४३.८४ चौ. कि. मी. इतके क्षेत्र होत आहे. पुणे मनपाच्या क्षेत्रामध्ये बांधकाम परवानगी, अनधिकृत बांधकाम निर्मूलन, विकास योजना विषयक कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ या कायद्यांतर्गत तसेच पुणे मनपा मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार कार्यान्वित आहे. बांधकाम नियंत्रण व विकास योजना या दोन्ही विभागांचे एकत्रीकरण करुन बांधकाम विकास विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. २००० चौ. मी. च्या आतील क्षेत्राचे बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विषयक सर्व कामकाज क्षेत्रिय स्तरावर करण्यात येते व २००० चौ. मी. मिळकत क्षेत्राच्या पुढील लेआउट व बांधकामपरवानगी विषयक कामकाज मुख्य कार्यालयाकडून होत आहे.

बांधकाम विकास विभागाकडे प्रामुख्याने पुणे मनपा कार्यक्षेत्रामधील दाखल होणाऱ्या विविध प्रकारच्या बांधकाम प्रस्तावांना जलदगतीने व विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देण्याचे काम आहे. सदर मान्य प्रस्तावाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेकडे विकास शुल्क व प्रिमिअमच्या स्वरुपामध्ये निधी जमा होत असतो. सदर बांधकाम परवानगी प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याकरीता सन २०१२–१३ मध्ये पुढीलप्रमाणे योजना राबविण्याचे उद्दीष्ट निर्देशित केलेले आहे.

- <u>व्हिसा प्रणाली</u>

बांधकाम परवानगी प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठी 'व्हिसा प्रणाली' सुरु करण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रणालीमध्ये दाखल बांधकाम प्रस्तावांचा निपटारा करण्याकरीता बांधकाम विकास विभागातील अधिकाऱ्यांचे क्षेत्रनिहाय कार्यक्षेत्र मर्यादित न ठेवता कार्यबाहुल्यानुसार व क्षमतेनुसार प्रस्ताव संमतीकरणाचे नियोजन करण्यात येणार आहे.

- <u>भोगवटा पत्र आदा करण्याची सुधारीत कार्यपध्दती</u>

बांधकाम विकास विभागाकडून देण्यात येणारे भोगवटा पत्र आदा करावयाच्या कार्यपध्दतीमध्ये आमूलाग्र बदल करण्यात आलेला आहे. भोगवटा पत्राचे अर्जासोबत आवश्यक असणाऱ्या विविध विभागाकडील ना–हरकत पत्रांचा सविस्तर व सखोल अभ्यास करुन ना–हरकत पत्र अर्जासोबत दाखल करणे (अंशत:) रद्द केले आहे. पर्यायाने बांधकाम पूर्णत्वास आल्यानंतर भोगवटा पत्र आदा करणेस विलंब लागणार नाही. तसेच भोगवटा पत्र आदा करावयाच्या सुसूत्र कार्यपध्दतीमुळे ना–हरकत प्रमाणपत्र आदा करण्याच्या पध्दतीमध्ये मुलभूत बदल होणार आहेत. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

- <u>वैयक्तिक भोगवटा पत्र</u>

पुणे महानगरपालिकेतर्फे मान्य बांधकाम प्रकल्पामध्ये ज्या ठिकाणी प्रवर्तक / डेव्हलपर यांनी स्वत:च्या जबाबदारीने भोगवटा पत्र न घेता रहिवासी यांना ताबा देण्यात येतो. पर्यायाने त्यानंतर भोगवटापत्रासाठी नागरिकांना पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा करावा लागतो. अशा प्रकल्पांमध्ये नागरिकांना स्वत: वैयक्तिक भोगवटा पत्राकरीता अर्ज करण्याची तरतूद समंत झालेली आहे.

- <u>लेआऊट मधील सुविधा क्षेत्र सामाजिक उपयोगाकरिता वापरणेबाबत :</u>

पुणे शहराचे नविन हद्दीवाढीनुसारचे क्षेत्रामध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार ०.४ हेक्टर क्षेत्राचे पुढील क्षेत्रावर विकसन करावयाचे झाल्यास १५ टक्के क्षेत्र ॲमिनिटी स्पेस आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. पुणे म.न.पा.चे वाढीव हद्दीमधील क्षेत्रामध्ये अद्याप मान्य झालेल्या लेआऊटमधील सुमारे ८५३ ॲमिनिटी स्पेस (क्षेत्र २४,२३,८६३.६० चौ. मी.) राखीव ठे वण्यात आलेले आहे. पुणे शहराच्या वाढीचा वेग पाहता, सदरची आरक्षणे तातडीने विकसित करुन ती नागरिकांना उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. ही आरक्षणे विकसित केल्यास पुणे मनपावर आर्थिक ताण न येता नागरिकांना जलद गतीने सोयीसुविधा वापरण्यासाठी उपलब्ध होणार आहेत व पर्यायाने विकास आराखड्याचीही अंमलबजावणी होणार आहे. सदर सुविधा क्षेत्रांचा विकास करताना, प्रारूप विकास योजना आराखड्यातील मानकांनुसार कमी पडणाऱ्या आरक्षण वर्गाचे प्राधान्य क्रमवारीनुसार जागेच्या सुलभतेचा विचार करून निश्चित केले जाईल. प्रारूप विकास योजनेमधील अहवालानुसार विविध नियोजन गटात प्राथमिक शाळा, सूतिकागृहे, रूग्णालये, उद्याने व क्रिडांगणे इत्यादी आरक्षण क्षेत्रांची कमतरता आहे. यातील प्राधान्याने प्राथमिक कर्तव्य म्हणून शाळा, रूग्णालये इत्यादी प्रकारची आरक्षणे विकसित करण्याकरीता पुणे महानगरपालिकेस जास्त रकमेच्या तरतूदीची आवश्यकता भासणार आहे.

तसेच वरीलप्रमाणे आरक्षणाची कमतरता भरून काढत असताना काही सुविधा क्षेत्रांवर व्यावसायिक वापर अनुज्ञेय करण्यासाठी शासकीय पातळीवर मान्यतेसाठी प्रलंबित असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक १३.८ (एम) सी–।। मध्ये व्यावसायिक वापर अनुज्ञेय करण्याची विनंती करता येईल अथवा अधिनियमाच्या तरतुदीनुसार गौण फेरफाराची कार्यवाही करावी लागेल. तसेच भविष्यामध्ये मंजूर अभिन्यासांमधून मोठ्या प्रमाणात सुविधा क्षेत्रे उपलब्ध होणार असून त्यामधूनही आरक्षण कमतरता क्षेत्र भरून काढता येणे शक्य आहे.

## ६) <u>भू–संपादन व व्यवस्थापन–(तरतूद रक्कम रुपये –४५.०० कोटी)</u>

- **मान्य लेआऊटमधील ॲमेनिटी स्पेस ताब्यात घेणे :**
  विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार मान्य लेआऊटमध्ये मंजूर करण्यात आलेल्या सर्व ॲमेनिटी स्पेस ताब्यात घेण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

- **भाड्याने देण्यात आलेल्या मिळकतींबाबत नियमबाह्य कृतींबाबत निष्कासनाची कार्यवाही करणे व संपूर्ण थकबाकी वसूल करणे :**
  भूमी आणि जिंदगी विभागाने भाड्याने दिलेल्या मिळकतींबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ ब मधील तरतूदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित जागाधारकास पुणे महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकण्याची कार्यवाही करयात येणार आहे. तसेच भूमी आणि जिंदगी विभागामार्फत भाड्याने देण्यात आलेल्या मिळकतींबाबत प्रत्येक प्रकरणी असलेली थकबाकी संपूर्णत: वसूल करणेचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

- **मिळकत व्यवस्थापनाकरीता संगणकीकरण करणे :**
  पुणे महानगरपालिकेच्या मिळकतींची माहिती एकत्रित स्वरुपात ठेवणेकरीता तसेच त्याव्दारे मिळकत व्यवस्थापनाची कार्यवाही करणेकरीता संगणकप्रणाली तयार करण्यात येणार आहे. यामुळे पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या सर्व मिळकतींची माहिती तात्काळ प्राप्त होऊन मिळकत व्यवस्थापनाची कार्यवाही देखील या संगणकप्रणालीमुळे जलदगतीने अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

१) सन २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये विविध जागांच्या संपादनासाठी ४० कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात आली असून एचसीएमटीआर रस्त्याचे भूसंपादनासाठी प्राधान्याने ५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

२) सन २०११–१२ मधील प्रस्तावित केलेल्या ३५ रस्त्यांचे प्रस्ताव पूर्णत्वास नेण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेला निधी गरजेनुरुप व वर्गीकरणाने उपलब्ध करुन द्यावा लागणार आहे.

३) उद्यानांसाठी त्याचबरोबर शाळा व रस्ते यासाठी आरक्षित असलेल्या जागांचे प्राधान्याने भूसंपादन करण्यात येणार आहे.

४) वारजे, वडगांव व बोपोडी या ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या जागांचे भूसंपादन चालू आर्थिक वर्षात करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक त्या रकमेची तरतूद करणे आवश्यक आहे.

५) ससाणेनगर (हडपसर) याठिकाणी करण्यात येणाऱ्या उड्डाणपूलांसाठी आवश्यक असणाऱ्या डी. पी. रस्त्याचे भू–संपादन प्राधान्याने करण्याचे नियोजन असून, त्यामुळे याठिकाणी वारंवार होणारी वाहतूकीची कोंडी सोडविण्यास मदत होणार आहे.

६) वडगांव धायरी येथील उड्डाणपूलासाठी आवश्यक असणारे भूसंपादन प्रगतीपथावर असून, ते प्राधान्याने पूर्ण करण्यात येणार आहे.

## ७) पथ व वाहतूक नियोजन–(तरतूद रक्कम रुपये ३०४.१७ कोटी)

- धायरी, सिंहगड रोड, येथे उड्डाणपूल बांधण्याचे सुमारे ३०% काम पूर्ण झालेले आहे. या उड्डाणपुलाचे उर्वरीत काम प्रगतीपथावर असून ते माहे मार्च, २०१३ अखेर त्याचबरोबर हडपसर गाडीतळ येथील उड्डाणपूलाचे काम सुरू करणेत आले असून हे कामही माहे सप्टेंबर, २०१३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. कोंढवा रोडवरील लुल्लानगर चौकातील वाहतूकीची कोंडी कमी करणेसाठी उड्डाणपूल बांधण्यात येणार असून त्यासाठीची निविदा मान्य झालेली आहे व सदरचे काम संरक्षण विभागाच्या मान्यतेनंतर सुरु करण्यात येणार आहे. सातारा रस्त्यावरील शंकर महाराज मठ ते भारती विद्यापीठ या दरम्यान उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू करण्यात आले असून ते पुढील ३० महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे सातारा रस्त्यावरील वाहतूकीची कोंडी कमी होऊन तेथील वाहतूक सुरळीत होण्यास हातभार लागणार आहे.

- पर्यावरणपूरक प्रथम दोन तासांसाठी भाडेमुक्त **(Rent Free)** व त्यापुढील तासांसाठी भाडेतत्वावरील सार्वजनिक सायकल योजना राबविणेकरिता प्रत्येक सायकलस्वाराचा रुपये एक लाख इतक्या रकमेचा विमा उतरविणेच्या अटीवर मा. मुख्य सभने मान्यता दिलेली आहे. सदर योजना सन २०१२–१३ मध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे.

- वनाझ ते रामवाडी दरम्यान मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदरचे काम चालू करण्यात येणार असून यासाठी सन २०१२–१३ चे अंदाजपत्रकात रक्कम रूपये ३ कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आलेली आहे.

## ८) <u>नागरवस्ती विकास योजना–(तरतूद रक्कम रुपये–३१.९९ कोटी)</u>

- सन २०१२–१३ साठी एकूण रक्कम रूपये ३१.९९ कोटीची तरतूद सुचविण्यात आलेली असून, इतर चालू योजनांबरोबरच खालील नवीन योजना खात्यातर्फे सुरू केल्या जाणार आहेत.

  १. **रात्र निवारा प्रकल्प :–** मे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शहरात विविध ठिकाणी रात्र निवारा प्रकल्प राबविणेत येणार असून, त्यासाठी अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये एक कोटीची तरतूद सुचविणेत आलेली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार पुणे शहरात १५९४ बेघर असून शहराच्या विविध भागांमध्ये मनपा मालकीच्या उपलब्ध इमारतीमध्ये सदर बेघर नागरिकांची रात्र निवाऱ्याची सोय करण्यात येणार आहे. सदरचे काम शहरातील स्वयंसेवी संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

  २. **अनैतिक व्यवसायात गुंतलेल्या महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान :–** अनैतिक व्यवसायात गुंतलेल्या शहरातील महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण तसेच स्वयंरोजगारासाठी अनुदान देण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

  ३. **कै. अशोक दिवाळी फराळ योजनाः–** कै. अशोक कळमकर, माजी सह महापालिका आयुक्त यांच्या नावाने सुरू केलेल्या बचतगट दिवाळी फराळ योजनेअंतर्गत पुढील वर्षापासून बचतगटांना अर्थार्जन व्हावे या दृष्टिकोनातून कै. अशोक दिवाळी फराळ योजना सुरू करणेत येत आहे.

- नागरवस्ती विकास योजनांअंतर्गत सन २०११–२०१२ मधील लाभार्थी संख्या विचारात घेऊन सन २०१२–२०१३ मध्ये सर्व योजनांच्या लाभार्थी संख्येत ५% वाढ करून उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.

## ९) <u>उद्यान–(तरतूद रक्कम रुपये ४३.०५ कोटी)</u>

- स्वर्गीय राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, कात्रज, येथे नीलगाय व भेकर यांचेसाठी खंदकाचे काम व नागरिकांना प्राण्यांची माहिती होणेसाठी इंटरप्रिटेशन सेंटरचे काम प्रगतीपथावर आहे.

- येरवडा येथे स्केटींग रिंग व हडपसर येथे शूटींग रेंजचे काम प्रगतीपथावर असून ही दोन्ही कामे सन २०१२–१३ मध्ये पूर्ण करण्यासाठी तरतूद सुचविण्यात आलेली आहे. शहरातील नागरिकांना जगातील आश्चर्यांची माहिती होण्याच्या दृष्टिने त्याच्या प्रतिकृती यशवंतराव चव्हाण उद्यान येथे विकसित करण्यात येत असून सदरचे काम काम प्रगतीपथावर आहे. सन २०१२–१३ मधील अंदाजपत्रकामध्ये वरीलप्रमाणे सुरु असलेली कामे पूर्ण करण्यासाठी तरतूदी सुचविण्यात आलेल्या आहेत.

- शाहू उद्यान, घोरपडी उद्यान, चित्तरंजन वाटिका, लोहीया उद्यान, हजरत सिद्दीकी उद्यान, काकासाहेब गाडगीळ उद्यान, सारसबाग, संभाजीराजे उद्यान अशा विविध उद्यानांचे नूतनीकरण करण्याची योजना असून, त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद सुचविण्यात आलेली आहे.

- व्हिलेज पार्क, अरोमा गार्डन, जंगल सफारी, बागुल उद्यान येथे थीम लाइटींग, मुघल गार्डन येथील विकास कामे, कात्रज तळ्यामधील संगीत कारंजे, लेझर शो, कात्रज येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय, येरवडा येथे पाम पार्क, तारांगण तसेच पुणे वन विभागाबरोबर संयुक्त वन व्यवस्थापन प्रकल्प राबविणेसाठी संरक्षक भिंती बांधणे इत्यादी कामांसाठी त्याचप्रमाणे शहरामध्ये नव्याने ताब्यात आलेल्या ॲमिनेटी स्पेसच्या जागांवर उद्याने विकसित करण्यासाठीही तरतुदी सुचविण्यात आलेल्या आहेत.

## १०) विद्युत विभाग–(तरतूद रक्कम रुपये ८.०२ कोटी)

- पर्यावरण पूरक दृष्टीकोन विचारात घेऊन वैकुंठ स्मशानभूमीमध्ये ओपन बर्निंग करिता वूड फायर एअर पोल्यूशन कंन्ट्रोल सिस्टीम बसविणेसाठी रक्कम रुपये १.५० लाख इतकी तरतूद सुचविलेली आहे.

- पुणे शहरातील विविध इमारतींसाठी सुरक्षिततेच्या दृष्टिने लाईटनिंग ॲरेस्टर यंत्रणा बसविण्याच्या कामासाठी रक्कम रुपये २५ लाख इतकी तरतूद सुचविलेली आहे.

- पुणे शहर हे झपाट्याने विकसित होणारे औद्योगिक, सांस्कृतिक व शैक्षणिक शहर असल्याने या सर्व स्तरांवर शहराची वाढ होत असल्याने भविष्यात ऊर्जेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. त्यामुळे ऊर्जा बचत हा खात्याचा प्राधान्यक्रम असणार आहे. एनर्जी ऑडिट पूर्ण झाल्याने त्यानुसार सन २०१२–१३ मध्ये कार्यवाही अपेक्षित आहे.

- पुणे शहरातील महत्वाचे प्रेक्षणीय स्थळ असणाऱ्या सारसबाग येथे प्रवेशद्वारापाशी आकर्षक प्रकाश व्यवस्था करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

- जुन्या बंडगार्डन पुलावर नियोजित वॉकिंग प्लाझाच्या अनुषंगाने करावयाच्या विशेष प्रकारच्या प्रकाश व्यवस्थेसाठी रक्कम रुपये २० लाख इतकी तरतूद सुचविलेली आहे.

## ११) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण–(तरतूद रक्कम रुपये २८५.८८ कोटी)

- पुणे महानगरपालिका संचालित माध्यमिक २१ पैकी ५ कनिष्ठ महाविद्यालयांसह सर्व शाळांमध्ये मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाच्या मोफत संधी उपलब्ध करुन देणे.

- विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सर्वांगीण विकासाच्या शिक्षण संधी उपलब्ध करुन देणे.

- महापालिकेकडून आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या वापरातून दर्जेदार व परिणामकारक अध्ययन व अध्यापनाच्या सुविधा निर्माण करुन दर्जेदार शिक्षणाची संकल्पना कार्यान्वित करणे.

- पुणे महानगरपालिका व **Thermax Social Initiative** च्या संयुक्त विद्यमाने के. सी. ठाकरे इंग्रजी माध्यमाची शाळा तसेच महानगरपालिकेच्या ३ कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळा व स्वर्गीय राजीव गांधी ॲकेडमी ऑफ ई–लर्निंग स्कूल अशा एकूण ५ शाळांच्या विविध योजनेवरील खर्च महानगरपालिका स्वत:चे निधीतून करणार असल्याचे प्रस्तावित केले आहे.

- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांना पुणे महानगरपालिकेमार्फत पीएमपीएमएल मोफत बसपास देण्याची योजना याही वर्षी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## १२) अग्निशामक

- सन २०१२–१३ मध्ये मुख्य इमारतीत अग्निशमन यंत्रणा, मध्यवर्ती अग्निशमन यंत्रणेच्या केंद्राच्या प्रशासकीय इमारतीचे नूतनीकरण करण्याचा मानस असून अग्निशामक दलाच्या ताफ्यामध्ये सुमारे ५ कि. मी. रेंज असलेली वॉटर हायड्रंट सप्लाय सिस्टीम समाविष्ट केली जाईल. तसेच सर्व प्रकारच्या अपघाताच्या ठिकाणी वापरता येणारी अत्याधुनिक रेस्क्यू व्हॅन व ४२ मीटर उंच शिडी असलेले एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

- कोंढवा व महंमदवाडी येथे नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याची योजना प्रस्तावित आहे.

## १३) आपत्ती व्यवस्थापन

- सन २०१२–१३ मध्ये सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्य वापराबाबत सखोल प्रशिक्षण देण्याचा नियोजनबध्द कार्यक्रम आखला जाईल. सदर साहित्याचा गरजेप्रमाणे नागरिकांना लाभ मिळून दिला जाईल. तसेच आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात जनजागृतीसाठी पुढील कार्यक्रम राबविण्यात येईल.

- आपत्ती व्यवस्थापनाच्या स्वतंत्र कक्षाची निर्मिती.
- आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्य वापराबाबतचे वारंवार प्रशिक्षण.
- पुणे महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी व सर्व अधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण.

## १४) भवन रचना (तरतूद रक्कम रुपये–१०१.१० कोटी)

- औंध व वानवडी येथील सांस्कृतिक केंद्रांची तसेच अण्णाभाऊ साठे स्मारक, महात्मा फुले पेठ येथील साध्वी सावित्रीबाई फुले स्मारक तसेच वीर बाजी पासलकर स्मारक यांची अंतर्गत सुशोभिकरण व विद्युतीकरणाची कामे पूर्ण करणे.

- मौलाना अबुल कलाम आझाद येथे हज हाऊससाठी इमारत बांधणे, कैलास स्मशानभूमी व संगमघाट येथे नूतनीकरणाची कामे करणे, मनपा मुख्य इमारतीच्या दक्षिण बाजूस इमारतीचे विस्तारीकरणाचे पहिल्या टप्प्याचे काम हाती घेणे, बुधवार पेठ येथील बाबू गेनू चौकासमोर मनपाच्या ताब्यात आलेल्या जागेवर व्यापारी संकुल बांधणे, लहुजी वस्ताद साळवे स्मारक व शाहू स्मारकाची सिव्हील कामे पूर्ण करणे, कस्तुरबा गांधी, गोंधळेनगर या ठिकाणी शाळा इमारत बांधणे, खराडी येथील स्पोर्टस् गॅलरीला छताचे काम करणे, बाबुराव सणस येथे येणाऱ्या खेळाडूंच्या निवासस्थानाची सोय करणे, कमला नेहरू हॉस्पिटल येथे नर्सेस क्वॉर्टरची इमारत बांधणे, चिखलवाडी येथे हॉकी स्टेडियमचे काम पूर्ण करणे इत्यादी कामे प्रस्तावित आहेत.

- स. नं. ५३, वडगांव बु., हिंगणेमळा, पाषाण सुतारदरा, खराडी, घोरपडी गांव, सुतारवाडी इत्यादी ठिकाणी जलतरण तलाव बांधण्याची कामे पूर्ण करणे.

पर्यावरण संतुलन व वाढत्या शहरीकरणास पूरक ठरण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, उद्याने, पाणी पुरवठा, मलनि:सारण, किफायतशीर घरांची उपलब्धता, घन कचरा व्यवस्थापन व वाहतूक व्यवस्था, इत्यादींचा पर्यावरणाशी सांगड घालून शहराचा समतोल व शाश्वत विकास होण्याच्या दृष्टिकोनातून या अर्थसंकल्पात तरतूदी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

नागरिक प्रशासनास अपेक्षित मुलभूत नागरी सेवा सुविधांचा दर्जा हा प्रामुख्याने निर्धारीत केलेल्या विहीत सेवा दर्जा मानकानुसार सातत्याने राखून 'नागरिकांची सनद' याव्दारे विहीत केलेल्या समय मर्यादित सेवा उपलब्धतेचे प्रशासकीय उत्तरदायीत्व जाणून, पायाभूत सुविधांचा विकास व नागरिकांना सुधारित कार्यपध्दतीव्दारे सेवांचा जलद पुरवठा यासाठी प्रशासन सदैव कटीबध्द राहून सुप्रशासनाच्या माध्यमातून विकास कार्यक्रम व्यवस्थापन अंमलबजावणीव्दारे शहराच्या वाढीबरोबर शहराच्या विकासाची आव्हाने पेलण्यासाठी सन २०१२–१३ चे अंदाजपत्रक तयार करुन मा. स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

पुणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने अंदाजपत्रक तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. पक्षनेते, मा. पदाधिकारी, मा. प्रभाग समित्या व इतर समित्यांचे मा. अध्यक्ष, पुणे महानगरपालिकेचे सर्व मा. सभासद, माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी, प्रसारमाध्यमे व त्यांचे प्रतिनिधी, कामगार संघटना, शहरातील नागरिक संघटना व विविध क्षेत्रातील नागरिक, स्वयंसेवी संस्था यांचे बहुमोल सहकार्य लाभले, त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. सर्व संबंधित मा. संसद सदस्य व सर्व संबंधित मा. विधिमंडळ सदस्य यांचेही बहुमूल्य सहकार्याबद्दल आभार मानतो. केंद्र व राज्य शासनाची भूमिका, धोरणे व मार्गदर्शन हे अत्यंत बहुमूल्य असते त्याबद्दल आणि महानगरपालिकेस केलेल्या अर्थसहाय्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. या प्रस्तावित अर्थसंकल्पाला मूर्तरूप देतांनाही सर्व घटकांचे सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा व्यक्त करून अर्थसंकल्पीय अंदाज आज दिनांक २४ फेब्रुवारी, २०१२ रोजी मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

दिनांक : २४ फेब्रुवारी, २०१२

**महेश पाठक**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.